| १३० | १४५ | २५८ |
| २४८ | २८० | ३५७ |

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# लाडकी बहीण योजनेतील जुमलेबाजी

राज्यात पुन्हा लाडकी बहीण योजनेवरून आरोप प्रत्यारोप दावे प्रतिदावे सुरू झालेले आहेत. गेल्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अर्थातच राजकीय हेतू डोळ्यासमोर ठेवून लाडकी बहीण योजना घाईघाईने लागू झाली होती. आज वर्ष-दीड वर्षानंतर सरकारला या योजनेतल्या काही त्रुटी लक्षात आल्या. त्रुटी म्हणण्यापेक्षाही लाडक्या बहिणींच्या नावाने नको ते लाडके लोक सरकारी पैसा ओरबाडत असल्याचे स्पष्ट झाले. त्यातली धक्कादायक बाब म्हणजे लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्यांमध्ये पाच हजार सरकारी कर्मचारी असल्याचे आढळून आले आहे. शिवाय बहिणींच्या नावाने १४ हजार पुरुषांनी लाडक्या बहिणींच्या तिजोरीतून हातसफाई केल्याचेच चित्र समोर येते आहे. सुरूवातीच्या काळात जवळपास अडीच कोटींच्या आसपास लाडक्या बहिणींना पैशांचे वाटप केले गेले. मात्र ज्यावेळेला राज्याच्या महालेखापालांकडून या योजनेसंदर्भात तपशीलवार माहिती मागायला सुरूवात झाली. तेव्हा सरकारचे धाबे दणाणले. कारण बहिणींच्या नावाने सरकारी पैशांचा नको ते लोक गैरफायदा घेत असल्याचे समोर येऊ लागले होते. सुरूवातीच्या काळात महिलांनी आपण देत असलेली माहिती खरी आहे अशा प्रकारचे पत्र सरकारला द्यायचे होते. ते दिल्यानंतर त्या लाडक्या बहिणींना दर महिन्याला योग्य त्या निधीचे वाटपही झाले मात्र हे पैसे घेणारे सगळ्या पात्र अशा महिलांनाही याचीही माहिती समोर येऊ लागली. म्हणून सरकारने सर्वांना केवायसी करण्याची सक्ती केली. केवायसी करत असताना आवश्यक असलेल्या कागदांची पूर्तता करावी लागते. त्या कागदपत्रांची किंवा आवश्यक त्या पुराव्यांची पूर्तता अनेक महिला करू शकल्या नाहीत. स्वाभाविकपणे अशा महिलांचे अनुदान बंद झाले. अपात्र अशा ज्या महिलांना पैसे दिले गेले. त्यांच्याकडून हे पैसे वसूल करण्याचा सरकारचा विचार दिसत नाही. मात्र ज्या पुरुषांनी या योजनेचा चुकीच्या पद्धतीने लाभ घेतला त्यांच्याकडून पैसे वसूल करण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे.

### बदमाशी करणाऱ्यांची मजा

एकूणच या योजनेचे उद्दीष्ट लक्षात घेतले तर त्यालाच हरताळ फासण्याचे काम सरकारकडून आणि काही बोगस लाडक्या बहिणींकडून झालेले दिसते. बोगस याचा अर्थ असा की, पात्रता नसतानादेखील या योजनेसाठी अर्ज केले गेले. म्हणजे ज्यांच्याकडे चारचाकी वाहने आहेत. ज्या महिला इन्कम टॅक्स भरतात अशांनी देखील सरकारी योजना आहे. फायदा मिळवून घ्या अशा प्रवृत्तीतून अर्ज केले गेले. सरकारी योजना म्हटल्यावर कोणीही काही बघणार नाही. सरकारी कारभारामध्ये अनेक गैरकारभार मॅनेज करता येतात. आपण केलेला अर्ज कोणाच्या लक्षात येणार नाही अशा समजुतीत अनेकजण होते. परंतु सरकारलाच अर्थखात्याकडून वारंवार दट्ट्या मिळत गेला. खरे तर यातले आणखी एक महत्त्वाचे कारण असे आहे की लाडकी बहीण योजनेवर दर महिन्याला होणारा जवळपास ३ हजार ६०० कोटींचा खर्च सरकारच्या आवाक्याबाहेर जाऊ लागला होता. कारण केवळ राजकीय फायदा डोळ्यासमोर ठेऊन योजना सुरू केली त्याचा राज्याच्या तिजोरीवर किती ताण पडेल याचा पुरेसा विचारच झाला नाही. परिणामी या योजनेचे भवितव्यही धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली होती. हा खर्च कमी करण्याच्या दिशेनेच सरकारची पावले पडत गेली आणि त्यातून आता जवळपास ८० लाख अपात्र महिलांची नावे समोर आलेली आहेत. म्हणजे दर महिन्याला होणाऱ्या एकूण खर्चाच्या जवळपास पंचवीस टक्के रक्कम खिरापतीसारखी वाटली गेली. गैरफायदा घेणाऱ्यांची नावे वगळल्यानंतर सरकारचे जवळपास पाचशे कोटी दर महिन्याला वाचण्याची शक्यता आहे. तिजोरीवर पडणारा भार लक्षात घेऊन अन्य खात्यांचे निधीदेखील या योजनेकडे वळवले जात होते. भविष्यात तर केंद्र सरकारकडून या योजनेसाठी पैसे मागण्याची वेळ येणार होती. याचा अर्थ योजनेचा उद्देश कितीही चांगला असला तरी त्याची अंमलबजावणी करताना सरकारी पातळीवर कसा धिंगाणा घातला जातो याचा हा नमुना म्हणता येईल. गेली दीड वर्ष लाखो महिलांना त्याचा फायदा होतो आहे. मात्र सरकारच्या या नव्या भूमिकेमुळे काही पात्र महिलादेखील त्यात भरडल्या जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### वर्षाला ४३ हजार कोटी

मुख्यमंत्र्यांनी ही लाडकी बहीण योजना बदनाम होण्याची बरीच मोठी कारणे सांगितली. त्यातली बदमाशी शोधून काढण्याचा आता जरी प्रयत्न होत असला तरी काही महिने तो खपवून घेतला गेला किंबहुना काही सरकारी कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळेसुद्धा अपात्र लोकांनीदेखील त्याचा फायदा उठवला. तेव्हा बदमाशी करणाऱ्या अशा कर्मचाऱ्यांचीदेखील झाडाझडती होणे गरजेचे ठरते. ज्या उत्साहाने ही योजना सुरू झाली. त्यावेळेला सरकार महिलांच्या बाबतीत किती उदार आहे हे दाखवण्याचा आटोकाट प्रयत्न झाला. परंतु आता या योजनेला गैरकारभाराचे चटके बसू लागले आणि त्याचे फटके अनेक लाडक्या बहिणींनाही सोसावे लागत आहेत. योजना कितीही चांगली असली तरी ती एकदा सरकारी योजना म्हटल्यावर गैरफायदा घेणारेदेखील तितकेच जागरुक असतात. पहिल्या वर्षातच या योजनेचा खर्च ४३ हजार कोटींवर गेल्याचे समोर आलेले आहे. म्हणजे यातले काही हजार कोटी हे अपात्र लोकांच्या खिशात गेले असे म्हणायला हरकत नाही. पुढची निवडणूक येईपर्यंत ही योजना सरकारला चालू ठेवावी लागेलच. शिवाय निवडणुकीपूर्वी पुन्हा या योजनेसाठी काही नवीन जुमलेबाजी होण्याची शक्यता आहे. देशात अनेक राज्यांमध्ये अशा प्रकारची योजना राबवली जाते. परंतु या योजनेचा फायदा घेणाऱ्यांची संख्या ही महाराष्ट्रात आहे. यातच या योजनेचे यश जरी दडलेले असले तरी ही योजना अपयशी होण्याचीही शक्यता त्यातच दडलेली असल्याचे स्पष्ट होते.

## सुविचार

विलास कोळेकर
मालेवाडी, जि. सांगली. मोबा.९४२२४२०६११

कल्पना, विचार आणि शब्द
ही मानवी इतिहासातील एक जबरदस्त शक्ती आहे.

## पंचांग

बुधवार, ३ जून २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर
* अधिक ज्येष्ठ कृष्ण तृतीया
नक्षत्र : पूर्वाषाढा
-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० धनु

रवी उदय- ०६-०२
रवी अस्त- १९-१२

संकष्ट चतुर्थी, चंद्रोदय रात्री ९.५२

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

### साबुदाणा-वरई वडा



★ **साहित्य** : २ उकडलेले बटाटे किसून, १ वाटी भिजवलेला साबुदाणा, १/२ वाटी भगरचे पीठ, चवीनुसार सैंधव मीठ, १/२ टीस्पून जीरे, कोथिंबीर चवीनुसार, १ टेबलस्पून उपवासाचे लाल तिखट, २ टेबलस्पून शेंगदाणा कूट, तेल तळण्यासाठी.

★ **कृती** : सर्वप्रथम परातीमध्ये उकडलेला बटाटा किसून घ्यावा त्यानंतर त्यात साबुदाणा घालून घ्यावा सोबत मीठ आणि लाल तिखट, जीरे घालून घ्यावेत आणि शेंगदाणा कुटही घालून घ्यावे.
हे सर्व घातल्यानंतर हाताने चांगले मळून घ्यावे म्हणजे साबुदाणा बारीक होईल आता याच मिश्रणात वरईचे बारीक केलेले पीठ घालावे हे पीठ बघत बघतच घालावे त्यानंतर त्याचे हातावर थापून गोळे तयार करावेत. हे गोळे जास्त मोठे नसावेत किंवा खूपच लहान नसावेत. तेल गरम करण्यास ठेवावे. तेल गरम झाल्यानंतर त्यात एकेक वडा सोडून तळून घ्यावे.
दोन्ही बाजूने छान खरपूस तळलेला वडा खाण्यास अतिशय उत्तम आणि कुरकुरीत लागतो. हा वडा दह्यासोबत खाण्यास घ्यावा किंवा खोबऱ्याच्या चटणी सोबत खाण्यास घ्यावा.

## क्रीडा

# २३ ग्रँड स्लॅम विजेतेपदांची मानकरी सेरेना विल्यम्स चार वर्षांनंतर पुन्हा व्यावसायिक टेनिसमध्ये

**२३ ग्रँड स्लॅम एकेरी विजेतेपदांची मानकरी आणि महिला टेनिसमधील सर्वकालीन महान खेळाडूंपैकी एक असलेली सेरेना विल्यम्स तब्बल चार वर्षांनंतर व्यावसायिक टेनिसमध्ये पुनरागमन करणार आहे. ४४ वर्षीय सेरेना आगामी क्वीन्स क्लब चॅम्पियनशिप स्पर्धेत दुहेरी प्रकारातून कोर्टवर उतरणार असून, तिच्या पुनरागमनामुळे टेनिस विश्वात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. २०२२ च्या यूएस ओपननंतर स्पर्धात्मक टेनिसपासून दूर राहिलेली सेरेना आता पुन्हा एकदा आपल्या कारकिर्दीच्या नव्या अध्यायाला सुरुवात करण्यासाठी सज्ज झाली आहे.**



■ लंडन

**लंडनमध्ये** ८ जूनपासून सुरू होणाऱ्या क्वीन्स क्लब चॅम्पियनशिपमध्ये तिला दुहेरी प्रकारासाठी वाईल्ड कार्ड मिळाले आहे. या स्पर्धेत तिची जोडीदार कोण असेल, याची घोषणा अद्याप झालेली नाही. विम्बल्डन पूर्वीची महत्त्वाची स्पर्धा म्हणून क्वीन्स क्लबला महत्त्व आहे. सेरेनाने तिच्या पुनरागमनाचे संकेत समाजमाध्यमावरही दिले. एका व्हिडिओमध्ये सतत वाजणाऱ्या फोनकडे पाहत ती मला माझा नंबर बदलावा लागेल असे म्हणताना दिसली. या व्हिडिओच्या कॅप्शनमध्ये तिने वाटतेय सगळ्यांना ही बातमी मिळाली आहे, असे लिहिले होते. त्यानंतर तिच्या पुनरागमनाची अधिकृत घोषणा करण्यात आली.

सेरेना विल्यम्सची कारकीर्द ही आधुनिक टेनिसमधील सर्वात यशस्वी कारकिर्दीमध्ये गणली जाते. १९९७ मध्ये मुख्य डब्ल्यूटीए सर्किटमध्ये पदार्पण केल्यानंतर तिने महिला टेनिसवर दीर्घकाळ अधिराज्य गाजवले. तिच्या नावावर २३ ग्रँड स्लॅम एकेरी विजेतेपद असून ओपन एरामधील हा एक ऐतिहासिक विक्रम मानला जातो. तिने ३१९ आठवडे जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान राखले, तर सलग १८६ आठवडे नंबर वन राहण्याची कामगिरीही केली. वर्षअखेरीस पाच वेळा जगातील अव्वल महिला टेनिसपटू म्हणून तिची नोंद झाली.

एकेरीबरोबरच दुहेरी प्रकारातही सेरेनाने मोठे यश मिळवले. तिची बहीण व्हीनस विल्यम्ससोबत तिने १४ ग्रँड स्लॅम दुहेरी विजेतेपदे जिंकली. विशेष म्हणजे या जोडीने खेळलेल्या सर्व १४ ग्रँड स्लॅम अंतिम सामन्यांमध्ये विजय मिळवला. ऑलिम्पिक स्पर्धांमध्येही विल्यम्स भगिनींनी सुवर्णयश मिळवत महिला टेनिसमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण केले. सेरेना ही एकेरी आणि दुहेरी या दोन्ही प्रकारांत करिअर गोल्डन स्लॅम पूर्ण करणारी एकमेव खेळाडू आहे. चारही ग्रँड स्लॅम स्पर्धा आणि ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकण्याचा पराक्रम तिने दोन्ही प्रकारांत साध्य केला आहे. सेरेनाच्या पुनरागमनामुळे आता तिच्या आगामी योजनांबाबत चर्चा सुरू झाली आहे. विशेषतः २८ जूनपासून सुरू होणाऱ्या विम्बल्डन स्पर्धेत ती सहभागी होणार का, याबाबत उत्सुकता वाढली आहे.

# नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या ७ व्या फेरीत भारतीय खेळाडूंचे दमदार पुनरागमन

■ ओस्लो

**नॉर्वे** बुद्धिबळ २०२६ स्पर्धेच्या सातव्या फेरीत भारतीय बुद्धिबळपटूंनी दमदार पुनरागमन करत विजेतेपदाच्या शर्यतीतील दावेदारी अधिक मजबूत केली. ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदाने अलीरेझा फिरौजाचा क्लासिकल सामन्यात पराभव करत विजय मिळवला, तर विश्वविजेता डी. गुकेशने वेस्ली सोविरुद्ध आर्मागेडन टायब्रेक जिंकून अतिरिक्त गुणांची कमाई केली. महिला गटात दिव्या देशमुखने कोनेरू हम्पीला आर्मागेडनमध्ये नमवत गुणतालिकेतील स्थान भक्कम केले.

ओपन गटात आर. प्रज्ञानंदाने अलीरेझा फिरौजाचा पराभव करत महत्त्वाचा विजय मिळवला. पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळताना त्याने २६ व्या चालीपासून मिळवलेली आघाडी कायम राखत सामना जिंकला. तर डी. गुकेश आणि वेस्ली सो यांच्यातील क्लासिकल सामना अनिर्णित राहिल्यानंतर आर्मागेडन टायब्रेकमध्ये गुकेशने विजय मिळवत १.५ गुणांची कमाई केली. जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या मॅग्नस कार्लसन आणि जर्मनीच्या व्हिन्सेंट कीमर यांच्यातील क्लासिकल सामना बरोबरीत सुटला. मात्र आर्मागेडनमध्ये कार्लसनने विजय मिळवत अतिरिक्त गुण मिळवले.

# इंडोनेशिया ओपनमध्ये सिंधूची विजयी सुरुवात

**मुंबई** - भारताची दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती पी.व्ही.सिंधूने इंडोनेशिया ओपन सुपर १००० बॅडमिंटन स्पर्धेत दमदार सुरुवात करत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. जागतिक क्रमवारीत १२व्या स्थानावर असलेल्या सिंधूने पहिल्या फेरीत थायलंडच्या बुसानन ओंगबामरुंगफानचा २५-२३, २१-१६ असा सरळ गेममध्ये पराभव करत आपली विजयी घोडदौड कायम राखली.

**MAHAVITARAN** Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

Tenders are invited from eligible bidders for Meter reading of LTIP consumers through CMRI and Manual meter reading on MR -9 sheet where CMRI is not possible, bill printing, Energy Bill distribution & taking acknowledgement from consumer under Palghar, Dahanu, Talasari ,Boisar-r, Saphale & Boisar-M Sub division of Palghar Division, Palghar Circle (Tender No. SE/PLG/TECH/CMRI/PLG/2026-27/T-07) for the amount of Rs. 60 Lakhs
Sale period of Tender (Online only):- **03.06.2026 to 13.06.2026.**
Submission due date (Online Only):-**13.06.2026 up to 11.00 hrs.**
For detail please visit company's
Website:- https://etender.mahadiscom.in/eatApp/
**Superintending Engineer, MSEDCL Palghar Small Circle.**

## नालंदा एस. आर. ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

नोंदणी क्र. एम.यू.एम./एस.आर.ए./एच.एस.जी./ (टी.सी.) १२२२४/२०१२ एफ.पी.नं. २७४, सीटीएस ५८०८, टीपीएस ३,
मौजे घाटकोपर, ता. कुर्ला, दामजी कंपाऊंड, पटेल चौक, घाटकोपर (पूर्व), मुंबई- ४०००७७.

उपरोक्त संस्थेच्या सभासदाचे निधन त्या तारखेला झाले असून त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या वारसांनी त्यांची सदनिका/गाळा तसेच भाग भांडवल आपले नावे हस्तांतरीत करण्यासाठी संस्थेकडे विहित नमुन्यात अर्ज केले आहेत. सदरहू मृत सभासदाने नामनिर्देशित केलेले नाही.

| मयत सभासदाचे नाव | मृत्युची तारीख | दुकान नं | वारसाशी नाते | वारसाचे नांव |
|---|---|---|---|---|
| कै. डालचंद वरदीचंद जैन | १२.०४.२०२६ | ३३ | मुलगा | श्री. श्यामलाल डालचंद जैन |
| | | | पत्नी | श्रीमती कमलाबाई डालचंद जैन |
| | | | मुलगा | श्री. सुरेश डालचंद जैन |
| | | | मुलगा | श्री. गजेंद्र डालचंद जैन |
| | | | मुलगा | श्री. राजेंद्र डालचंद जैन |

संस्था या नोटीसव्दारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सभासदांचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदांचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्या कडुन हक्क मागण्या/हरकती मागविण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन १४ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतीच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमुद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हीतसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर असा कोणत्याही हक्क मागण्या/हरकती आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधीची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांच्याकडे सोमवार - शनिवार सकाळी ११ ते १ या वेळेत नोटीस दिल्याच्या तारखेपासून नोटीसची मुदत संपण्याच्या तारखे पर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण - घाटकोपर (पूर्व), मुंबई- ७७
दिनांक - ०३.०६.२०२६
*नालंदा एस. आर. ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित*
*सही /सचिव*

फॉर्म जी
स्वारस्य अभिव्यक्तीकरिता निमंत्रण

## ओडिसिया डिस्ट्रिब्युशन टेक्नॉलॉजीस प्रायव्हेट लिमिटेड

(इतर दुकानाबाहेरील किरकोळ विक्रीचा व्यवहार (नेटवर्क मार्केटिंगसह))
(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियम, २०१६ चे विनियम ३६ए चे उप-विनियम (१) अन्वये)

| अ.क्र. | संबंधित तपशिल | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव पॅन आणि सीआयएन/ एलएलपी क्रमांकासह | **ओडिसिया डिस्ट्रिब्युशन टेक्नॉलॉजीस प्रायव्हेट लिमिटेड** **पॅन क्र.:** AACC08394A **सीआयएन क्र.:** U52599DL2018PTC343068 |
| २ | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | ४५-ए, फ्लॅट बी-२, पहिला मजला, बेगमपूर, मालवीय नगर, नवी दिल्ली - ११००१७, दिल्ली |
| ३. | वेबसाइटची युआरएल | कंपनीची कोणतीही वेबसाइट नाही. |
| ४ | ज्या ठिकाणी बहुसंख्य स्थिर मालमत्ता आहेत त्या ठिकाणाचे तपशील | लागू नाही. |
| ५ | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | लागू नाही. |
| ६ | मागील आर्थिक वर्षात विकल्या गेलेल्या मुख्य उत्पादनांचे/सेवांचे मूल्य | सीडी हे २०२४ पासून कार्यरत नाही. |
| ७ | कर्मचारी/कामगारांची संख्या | सध्या कोणतेही कर्मचारी नाहीत. |
| ८ | दोन वर्षांचे शेवटचे उपलब्ध वित्तीय अहवाल (अनुसूचीसह), कर्जदारांच्या याद्या यासह अधिक तपशील युआरएल वर उपलब्ध आहेत: | वित्तीय वर्ष २०२४ साठीचे शेवटचे लेखापरीक्षित वित्तीय अहवाल उपलब्ध आहेत. इतर तपशील cirp.odicea@gmail.com या ई-मेलवर संपर्क साधून प्राप्त करता येतील. |
| ९ | संहितेच्या कलम २५(२)(एच) अंतर्गत रिझोल्यूशन अर्जदारांची पात्रता येथे उपलब्ध आहे: | सदर माहिती cirp.odicea@gmail.com या ई-मेल पत्त्यावर विनंती पाठवून प्राप्त करता येईल. |
| १० | अभिव्यक्ती स्वारस्य प्राप्त करण्याची शेवटची तारीख | गुरुवार, १८ जून २०२६ |
| ११ | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी जारी करण्याची तारीख | मंगळवार, २३ जून २०२६ |
| १२ | तात्पुरत्या यादीवर हरकती सादर करण्याची शेवटची तारीख | रविवार, २८ जून २०२६ |
| १३ | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी जारी करण्याची तारीख | मंगळवार, ३० जून २०२६ |
| १४. | संभाव्य रिझोल्यूशन अर्जदारांना माहिती ज्ञापन, मूल्यांकन मॅट्रिक्स आणि रिझोल्यूशन प्लॅनची विनंती जारी करण्याची तारीख | बुधवार, १ जुलै २०२६ |
| १५. | ठराव योजना सादर करण्याची अंतिम तारीख | शुक्रवार, ३१ जुलै २०२६ |
| १६. | स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्यासाठी ईमेल आयडीची प्रक्रिया करा | cirp.odicea@gmail.com |
| १७ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या एमएसएमई म्हणून नोंदणी स्थितीची माहिती. | कॉर्पोरेट कर्जदार एमएसएमई म्हणून नोंदणीकृत आहे. |

*दिनांक: ३ जून २०२६*
*ठिकाण: मुंबई*
*ओडिसिया डिस्ट्रीब्युशन टेक्नॉलॉजीस प्रायव्हेट लिमिटेडकरिता*
*सही/-*
*केडीआरए इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड*
*रिझोल्यूशन प्रोफेशनल*
*ओडिसिया डिस्ट्रीब्युशन टेक्नॉलॉजीस प्रायव्हेट लिमिटेड*
आयबीबीआय नोंदणी क्र.: IBBI/IPE-0059/IPA-1/2022-23/50037
रिझोल्यूशन प्रोफेशनलचा पत्रव्यवहाराचा पत्ता :
१६०१, युनिकॉर्न, दत्ताजी साळवी मार्ग, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ४०००५३
नोंदणीकृत ई-मेल : irp@kdraip.com
पत्रव्यवहारासाठी ई-मेल : cirp.odicea@gmail.com

## ई-लिलाव सूचना

नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अंतर्गत
**विलबेरी हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)**
नोंद कार्या.: १३०, शांता इंडस्ट्रीयल इस्टेट, १ ला मजला, आय. बी. पटेल मार्ग, गोरेगाव पूर्व, मुंबई ४०००६३.

**कॉर्पोरेट ऋणकोच्या संपत्तीची विक्री**
नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या तरतुदींअंतर्गत
**लिलावाचा दिनांक आणि वेळः शनिवार, दि. २० जून, २०२६, दु. १२.०० ते दु. २.०० वाजेपर्यंत**
(प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)

नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ आणि त्याअंतर्गत असलेल्या नियमनांअंतर्गत, सर्वसाधारण जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठाद्वारे त्यांच्या आदेश दिनांक ३०.०६.२०२५ (दि. ०७.०७.२०२५ रोजी प्राप्त) नुसार नियुक्त परिसमापकाद्वारे बनविण्यात आलेल्या परिसमापन संपत्तीचा भाग असलेल्या **"मे. विलबेरी हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड - परिसमापनामध्ये (कॉर्पोरेट ऋणको)"**च्या संपत्तीच्या विक्रीकरिता ई-लिलाव प्रक्रियेच्या संबंधात इच्छुक बोलीदारांकडून बोली आमंत्रित करण्यात येत आहेत. निम्नस्वाक्षरीकारांद्वारे ई-लिलाव प्लॅटफॉर्म https://baanknet.com मार्फत विक्री करण्यात येईल.

आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३२ अन्वये कॉर्पोरेट ऋणकोच्या संपत्तीची विक्री

| संपत्तीचे तपशील | राखीव किंमत | इसारा रक्कम अनामत | बोली विस्तार मूल्य |
|---|---|---|---|
| जमीन आणि इमारत (गेस्ट हाऊस) I. भूखंड क्र. आरआय-३९, युनिट क्र. ४, १ला मजला, स्प्लेन्डर अपार्टमेन्ट्स, एमआयडीसी, रेसिडेन्शियल झोन, जि. ठाणे, उप जिल्हा - कल्याण, डोंबिवली पूर्व - ४२१२०३. क्षेत्रफळ मोजमाप ७१.७३ चौ.मी. | रु. ३८,२४,९७५/- (रुपये अडतीस लाख चोवीस हजार नऊशे पंचाहत्तर मात्र) | रु. ३,८२,४९७/- (रुपये तीन लाख ब्याऐंशी हजार चारशे सत्याण्णव मात्र) | रु. १,००,००० (रुपये एक लाख मात्र) |
| प्लान्ट आणि मशिनरी - मोटर वाहन II. मारुती सुझुकी एस-प्रेसो (MH47AU7902) | रु. २,२०,३२०/- (रुपये दोन लाख वीस हजार तीनशे वीस मात्र) | रु. २२,०३२/- (रुपये बावीस हजार बत्तीस मात्र) | रु. १०,००० (रुपये दहा हजार मात्र) |

**ई-लिलावाच्या महत्त्वाच्या अटी आणि शर्तीः**

१. असे स्पष्ट करण्यात येते की, या आमंत्रणाचा हेतू इच्छुक बोलीदारांना आमंत्रित करणे हा आहे आणि विक्री करण्याकरिता परिसमापक किंवा कॉर्पोरेट ऋणकोकडून कोणत्याही प्रकारचे बंधन किंवा वचनबद्धता निर्माण करीत नाही. कोणतेही कारण न दर्शविता आणि कोणत्याही दायित्वाशिवाय प्रक्रिया रद्द करण्याचा किंवा त्यामध्ये बदल करण्याचा आणि/किंवा कोणत्याही बोलीदाराला स्वीकारण्याचा आणि/किंवा अपात्र ठरविण्याचा अधिकार परिसमापकास आहे. इच्छुक बोलीदारांनी लिलावात ठेवलेल्या वस्तुंबाबत स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी.
२. बोलीदारांनी "खरेदीदार नोंदणी" टॅब अंतर्गत नोंदणी करून बँकनेटच्या ई-लिलाव पोर्टल https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/bidder-registration वर पूर्व-पात्रता दस्तऐवज व त्यासह नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम २९ए अन्वये, लागू असलेल्या मर्यादेपर्यंत अपात्र नाहीत याची पुष्टी करणारे हमीपत्र सादर करावे. कोणत्याही टप्प्यावर जर बोलीदार अपात्र आढळल्यास, **ईएमडी जप्त करण्यात येईल.**
३. निर्दिष्ट वेळेनुसार विहीत ईएमडी जमा केली तरच बोलीदारांना बोली लावण्यास परवानगी देण्यात येईल.
४. विक्री पूर्ण करण्याकरिता यशस्वी बोलीदारास नोंदणी शुल्क आणि इतर लागू कर/प्रभार अतिरिक्त भरावे लागतील.
५. मालमत्तेची ई-लिलावाद्वारे एकत्रित विक्री **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे", "तेथे जे आहे"** आणि **"कोणत्याही आधाराशिवाय"** तत्त्वावर काटेकोरपणे करण्यात येईल, कारण अशी विक्री कोणत्याही प्रकारच्या हमी आणि नुकसानभरपाईशिवाय मान्यताप्राप्त सेवा प्रदाता मे. पीएसबी अलायन्स द्वारे बँकनेट https://baanknet.com/ वर करण्यात येईल.
६. **ई- लिलावाअंतर्गत कालमर्यादा खालीलप्रमाणे आहेः**

| | |
|---|---|
| सहभागाचे विनंती पत्र/केवायसी/ हमीपत्र सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. १८ जून, २०२६ |
| ईएमडी सादरीकरणाचा अंतिम दिनांक | दि. १८ जून, २०२६ |
| पाहणीचा दिनांक आणि वेळ | दि. ३ जून, २०२६ ते दि. १८ जून, २०२६ पर्यंत स. ११.०० ते सायं. ०४.३० पर्यंत |
| ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ | दि. २० जून, २०२६ रोजी दु. १२.०० ते दु. २.०० (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह) |
| ई-लिलाव पोर्टल | https://baanknet.com/ |
| लिलाव एजन्सीचा संपर्क व्यक्ती | पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेड, मोबा. क्र. +९१ ८२९१२ २०२२० |
| परिसमापक आणि टीमचे संपर्क तपशील | श्री. हर्षल गोटी, मोबा. क्र. ७२०८५९९४०० |

७. निविदा दस्तऐवज आणि इतर तपशीलाच्या माहितीकरिता तुमची विनंती eoi.vhpl@gmail.com येथे ईमेल करावी.
८. या लिलाव सूचनेचा विस्तार / शुद्धीपत्रक https://baanknet.com/ वेबसाईटमध्ये सूचित करण्यात येईल आणि स्वतंत्र वृत्तपत्र प्रसिद्धी पारित करण्यात येणार नाही. इच्छुक बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कृपया ibbi.baanknet.com/ लिलाव वेबसाईटला भेट द्यावी.

**सही/-**
**गौरांग छोटालाल शाह**
**नियुक्त संचालक**
**मे. वॉटरफॉल इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड**
**आयबीबीआय नोंदणीः** IBBI/IPE-0022/IPA-1/2022-23/50016
**एएफएः** AA1/50016/02/311226/20083 वैधता दि. ३१.१२.२०२६ पर्यंत
**विलबेरी हेल्थकेअर प्रा. लि. - परिसमापनाअंतर्गत**
**च्या प्रकरणामध्ये परिसमापक**
**आयबीबीआय नोंदणीः** IBBI/IPA-002/IP-N00947/2019-2020/13002
**एएफएः** AA2/13002/02/300626/203927 वैधता दि. ३०.०६.२०२६ पर्यंत
**ईमेल आयडी (प्रक्रिया विशिष्ट)ः** eoi.vhpl@gmail.com
**ईमेल आयडी (आयबीबीआयकडे नोंदणीकृत)ः** waterfall0421@gmail.com
**परिसमापकाचा पत्ताः** वॉटरफॉल इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रा. लि., १२२१, मेकर चेंबर V, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०००२१.
**दिनांकः ०३.०६.२०२६**
**ठिकाणः मुंबई**

६
# चंदेरी च्वींगम
नवाकाळ
मुंबई । बुधवार
३ जून, २०२६
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

## आदर्श झळकणार 'एलियन अर्थ'च्या दुसऱ्या भागात



**अभिनेता** आदर्श गौरव हा त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील एका महत्त्वाच्या टप्प्यासाठी सज्ज झाला आहे. तो 'एलियन: अर्थ' या प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय मालिकेच्या दुसऱ्या भागाच्या (सीझन २) चित्रीकरणाला सुरुवात करणार आहे. या मालिकेच्या चित्रीकरणासाठी तो जून महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात एका आंतरराष्ट्रीय ठिकाणी रवाना होणार असून, त्यानंतर लगेचच चित्रीकरणाला सुरुवात होईल.


या मालिकेच्या पहिल्या भागात आदर्श गौरवने 'स्लाईटली' ही भूमिका साकारली होती. दुसऱ्या भागातही तो याच भूमिकेत पुनरागमन करत आहे. ही भूमिका अतिशय गुंतागुंतीची आणि अनपेक्षित वळणे घेणारी असल्यामुळे ती आपल्यासाठी अत्यंत खास असल्याचे आदर्शने म्हटले आहे.



## 'है जवानी...'मधून नेमके काय वगळले?

**केंद्रीय** चित्रपट प्रमाणन मंडळाने (सेन्सॉर बोर्ड) 'है जवानी तो इश्क होना है' या आगामी विनोदी चित्रपटाला काही बदलांसह 'यू/ए १६+' प्रमाणपत्र दिले आहे. चित्रपटगृहात प्रदर्शित होण्यापूर्वी सेन्सॉर बोर्डाने या चित्रपटातील काही दृश्यांवर आणि शब्दांवर कात्री चालवली आहे. चित्रपटात दिसणारे कंडोम ब्रँडचे नाव अस्पष्ट (ब्लर) करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच त्यासोबत येणारे फ्लेवर्सचे नाव म्यूट करण्यास सांगितले आहे. याशिवाय, इंग्लंडचे प्रसिद्ध क्रिकेटपटू बेन स्टोक्स आणि जोस बटलर यांच्या नावांचा संदर्भ असलेले एक दृश्य दृश्यमान पातळीवर संपादित करून ६ सेकंदांचे करण्यात आले आहे.

बोर्डाने चार वेगवेगळ्या ठिकाणी वापरलेले आक्षेपार्ह शब्द बदलून योग्य शब्दांचा वापर करण्यास सांगितले आहे. तसेच हाताने केलेला एक अश्लील हावभावही दृश्यातून काढून टाकण्याच्या सूचना दिल्या आहेत. एका नृत्य दृश्यामध्ये महिलांचे अंतर्वस्त्र दिसत असल्यामुळे, ते दृश्य झूम करून केवळ त्यांचा चेहरा आणि शरीराचा वरचा भागच दाखवण्याचे आदेश निर्मात्यांना देण्यात आले आहेत.




## जूनमध्ये वेबसीरिजचा धमाका

**जून** २०२६ मध्ये विविध ओटीटी प्लॅटफॉर्मवर अनेक नवनवीन आणि बहुप्रतिक्षित हिंदी वेब सीरिज प्रेक्षकांच्या भेटीस येत आहेत.

मेड इन इंडिया: टायटन स्टोरी ही सीरिज ३ जून २०२६ रोजी ॲमेझॉन एम एक्स प्लेयरवर प्रदर्शित होत आहे. 'टायटन' या घड्याळ कंपनीच्या प्रवासावर आधारित सहा भागांचे चरित्रपट नाट्य आहे. व्यावसायिक दिग्गज जे. आर. डी. टाटा आणि झेरक्सेस देसाई यांनी नोकरशाहीचा दबाव, तस्कर आणि जागतिक बाजारपेठेतील संशयास्पद वातावरणावर मात करत हा ब्रँड कसा उभा केला, याची रंजक कथा यात पाहायला मिळेल. पिरॅमिड स्कीम : ही वेब सीरिज ५ जून २०२६ रोजी प्राईम व्हिडिओवर प्रदर्शित होणार आहे. 'द व्हायरल फिव्हर' म्हणजेच टीव्हीएफ निर्मित या सीरिजचे दिग्दर्शन श्रेयांश पांडे आणि आशिष आर. शुक्ला यांनी केले आहे. ही सीरिज झटपट श्रीमंत होण्याच्या नादात पिरॅमिड स्कीम म्हणजेच फसव्या साखळी पद्धतीमध्ये अडकणाऱ्या आणि चुकीच्या मार्गाने जाणाऱ्या तरुणाईच्या धोक्यांवर प्रकाश टाकते.

ब्राऊन : अभिनेत्री करिश्मा कपूर मुख्य भूमिकेत असलेली ही सीरिज ५ जून २०२६ रोजी झी ५ वर प्रदर्शित होत आहे. ती यात रिटा ब्राऊन या मुख्य भूमिकेतून पुनरागमन करत आहे. कोलकाताच्या पार्श्वभूमीवर बेतलेल्या या निओ-नोइर क्राईम थ्रिलरमध्ये, दारूच्या आहारी गेलेली एक माजी महिला पोलीस अधिकारी आणि तिचा ज्युनियर सहकारी मिळून महिलांची हत्या करणाऱ्या एका क्रूर सीरियल किलरचा शोध घेताना दिसतील.

राख : ही एक शोध घेणारी क्राईम थ्रिलर सीरिज असून, ती १२ जून २०२६ रोजी प्राईम व्हिडिओवर प्रदर्शित होईल. १९७८ मधील गाजलेल्या रंगा-बिल्ला प्रकरणावरून प्रेरित असलेल्या या कथेत अभिनेता अली फझल एका सब-इन्स्पेक्टरच्या भूमिकेत असून, तो दोन अल्पवयीन मुलांच्या हत्येचा तपास करण्यासाठी देशभरात मोहीम राबवतो. सोनाली बेंद्रे आणि आमीर बशीर यांच्याही यात महत्त्वाच्या भूमिका आहेत.

ुकरा के मेरा प्यार - सीझन २: पहिल्या भागाच्या यशानंतर या सिरीजचा दुसरा भाग १९ जून २०२६ रोजी जिओ हॉटस्टारवर प्रदर्शित केला जाणार आहे. यात प्रेम, राजकीय कारस्थाने आणि सूडाची भावना यांचे गुंतागुंतीचे जाळे पाहायला मिळेल. कुलदीप आणि शन्वीका यांच्यातील महत्त्वाकांक्षा आणि लपलेली कारस्थाने यावर ही पुढील कथा आधारित असेल.



## 'दृश्यम ३'चे रॅप अप

**अभिनेता** अजय देवगणची मुख्य भूमिका असलेल्या 'दृश्यम ३' या बहुप्रतिक्षित हिंदी चित्रपटाचे चित्रीकरण अधिकृतपणे पूर्ण झाले आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक अभिषेक पाठक यांनी सोशल मीडियावर एक भावूक पोस्ट शेअर करत 'रॅप-अप'घोषणा केली आहे. चित्रपटाच्या सेटवरील एक फोटो शेअर करत अभिषेक पाठक यांनी लिहिले की, गेल्या अनेक महिन्यांपासून हा चित्रपट एवढेच आमचे जग बनले होते. आम्ही अनेक दिवस आणि रात्री एकत्र घालवल्या, अडचणी सोडवल्या, एकत्र हसलो, आव्हानांवर मात केली आणि हळूहळू ही कथा जिवंत केली. या प्रवासात प्रत्येक टप्प्यावर चित्रपटामध्ये विश्वास दाखवल्याबद्दल, संयम राखल्याबद्दल आणि कठोर परिश्रमांबद्दल मी संपूर्ण टीमचा ऋणी आहे. चित्रपटाच्या निर्मितीदरम्यान अनेक चांगले, कठीण आणि आव्हानात्मक दिवस आले, पण टीममधील प्रत्येकाने नेहमीच आपले सर्वोत्तम योगदान दिले, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. येत्या २ ऑक्टोबर २०२६ रोजी हा चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

## 'वेलकम टू द जंगल' ठरणार सर्वात मोठा ब्लॉकबस्टर



**ताणतणावाच्या** वातावरणात प्रेक्षकांना मनसोक्त हसवण्यासाठी 'वेलकम टू द जंगल' हा चित्रपट सज्ज झाला असून तो २०२६ मधील बॉलीवूडचा सर्वात मोठा 'स्ट्रेसबस्टर' ठरेल, असा विश्वास चित्रपटाच्या टीम कडून व्यक्त करण्यात येत आहे. हा चित्रपट केवळ एक विनोदी पट नसून, प्रेक्षकांना एका वेगळ्याच दुनियेत घेऊन जाणारा एक भव्य कौटुंबिक मनोरंजक चित्रपट असेल.

या चित्रपटाचे दिग्दर्शन अहमद खान करत असून, फिरोज नाडियाडवाला यांनी याची निर्मिती केली आहे. चित्रपटात अक्षय कुमार, सुनील शेट्टी, परेश रावल, अर्शद वारसी आणि जॅकलीन फर्नांडिस यांसारख्या तगड्या कलाकारांची फौज मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या मालिकेच्या आधीच्या भागांनी म्हणजेच 'वेलकम' आणि 'वेलकम बॅक' या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला होता. आता हा तिसरा भाग आणखी भव्य प्रमाणावर, उत्कृष्ट ॲक्शन आणि खुसखुशीत संवादांसह येत्या खिसमसच्या मुहूर्तावर प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे.

## आव्हानात्मक भूमिकेत किर्ती



**कीर्ती** सुरेशने आजवर प्रामुख्याने भावनिक कौटुंबिक नाटक आणि रोमँटिक चित्रपटांमध्ये काम केले आहे. मात्र, आगामी थरारपटात ती पहिल्यांदाच एका वेगळ्या आणि आव्हानात्मक भूमिकेत दिसू शकते. चित्रपटसृष्टीतील एका आघाडीच्या दिग्दर्शकासोबत तिची या विषयावर चर्चा सुरू असून, हा प्रकल्प सध्या प्राथमिक स्तरावर आहे. या चित्रपटाची अधिकृत घोषणा अद्याप झालेली नसली, तरी तिच्या व्यावसायिक प्रवासातील हा एक महत्त्वाचा चित्रपट ठरू शकतो.

दरम्यान, कीर्ती सध्या 'रफ्तार' या चित्रपटामुळेही चर्चेत आहे. या चित्रपटात ती अभिनेता राजकुमार रावसोबत मुख्य भूमिकेत दिसणार असून, हा चित्रपट येत्या ऑक्टोबर महिन्यात चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. थरारपटांसाठी आवश्यक असणारीभावनिक खोली कीर्तीच्या अभिनय शैलीला उत्तम न्याय देऊ शकते, असा अंदाज वर्तवला जात आहे.

## एचएसएनसी विद्यापीठाचा विस्तार सहा महाविद्यालयांचा समावेश

■ मुंबई

**राज्य** मंत्रिमंडळाने मुंबईच्या हैद्राबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट विद्यापीठ (एचएसएनसी विद्यापीठ) या समूह विद्यापीठामध्ये सहा महाविद्यालयांचा समावेश करण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे विद्यापीठाचा शैक्षणिक विस्तार होणार असून विविध शाखांमधील उच्च शिक्षणाला नवी चालना मिळणार आहे.

मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार, प्राचार्य के. एम. कुंदनानी औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, मुंबई, किशनचंद चेलाराम विधि महाविद्यालय, मुंबई, श्रीमती मिठीबाई मोतीराम कुंदनानी वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, ऋषी दयाराम आणि सेठ हसराम नॅशनल आणि सेठ वासियामुल्ल असोमुल्ल विज्ञान महाविद्यालय, मुंबई तसेच थडोमल शाहनी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई यांचा एचएसएनसी विद्यापीठाच्या घटक महाविद्यालयांमध्ये समावेश करण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे औषधनिर्माणशास्त्र, विधी, वाणिज्य, अर्थशास्त्र, विज्ञान आणि अभियांत्रिकी अशा विविध शैक्षणिक शाखा एकाच विद्यापीठीय व्यवस्थेखाली येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक व्यापक शैक्षणिक सुविधा, संशोधनाच्या संधी आणि बहुविषयक शिक्षणाचा लाभ मिळणार आहे.

## काशिमिरा येथे नाल्यात पडून ४ वर्षीय मुलाचा मृत्यू

■ मिरा रोड

**काशिमिरा** येथील उघड्या नाल्यात पडून ४ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. गणेश सिंग असे या मयत मुलाचे नाव आहे. सोमवारी सकाळी नाल्यात त्याचा मृतदेह आढळून आला.

रमा सिंग (३०) ही महिला काशिमिरा पूर्वेच्या उड्डाणपूलाखाली पदपथावर रहात होती. या ठिकाणी असलेल्या बस थांब्या जवळ पाणी वाहून जाणारा मोठा नाला आहे. नाल्याजवळ कठडा बांधला आहे. रविवारी रात्री तिचा मुलगा गणेश सिंग (४) हा खेळता खेळता नाल्याच्या कठड्यावरून नाल्यातील पाण्यात पडला. काल सकाळी त्याचा मृतदेह आढळून आला.या प्रकरणी काशिमिरा पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली आहे.

## रस्त्यावरील नमाजावर बंदी घाला किरीट सोमय्यांची पत्रातून मागणी

■ मुंबई

**मुंबईतील** रस्त्यांवर आणि सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या नमाज पठणाच्या मुद्द्यावरून भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी मुंबई महानगरपालिका आयुक्त आणि मुंबई पोलीस आयुक्त यांना पत्र लिहून कारवाईची मागणी केली आहे. रस्त्यावरील नमाज पठण तातडीने बंद करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी पत्राद्वारे केली आहे.

किरीट सोमय्या यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, मुंबईसारख्या महानगरात रस्त्यांवर नमाज पठण करण्यास परवानगी देणे ही गंभीर बाब असून त्यामुळे वाहतुकीवर परिणाम होतो. रस्त्यावरील नमाज पठण रोखणे ही मुंबई पोलीस, वाहतूक पोलिस, महापालिका प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाची जबाबदारी आहे. अनेक ठिकाणी रेल्वे स्थानकांबाहेर, चौकांमध्ये आणि वर्दळीच्या रस्त्यांवर विशेषतः शुक्रवारी नमाज पठण केले जाते. त्यामुळे वाहतुकीचा खोळंबा होतो आणि सर्वसामान्य नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. कामकाजाच्या दिवशी सार्वजनिक व्यवस्थेत अडथळा निर्माण होईल, अशा प्रकारच्या कृतींना परवानगी देऊ नये. सार्वजनिक ठिकाणांचा वापर करताना कायदा व सुव्यवस्था आणि वाहतूक व्यवस्थेचा विचार केला गेला पाहिजे.

## वांद्र्यात परवानगीशिवाय ड्रोन शो ! दोघांविरोधात गुन्हा दाखल

■ मुंबई

**सुरक्षा** दृष्टीने अतिसंवेदनशील मानल्या जाणाऱ्या वांद्रे पश्चिम परिसरात परवानगीशिवाय २०० हून अधिक ड्रोन उडवून जाहिरातीसाठी व्हिडिओ शूटिंग केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी दिल्लीस्थित एका मार्केटिंग कंपनीशी संबंधित दोन अधिकाऱ्यांविरोधात वांद्रे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

वांद्रे परिसरात मोठ्या प्रमाणावर ड्रोन उडवले जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत कारवाई केली. यावेळी सुरू असलेले ड्रोन ऑपरेशन तातडीने थांबवण्यात आले. कारवाईदरम्यान पोलिसांनी २०० हून अधिक उच्च दर्जाचे, कॅमेऱ्यांनी सज्ज ड्रोन, त्यांचे नियंत्रण

## सोलापुरात काँग्रेस उमेदवाराचा अर्ज बाद सूचकाचा आक्षेप! कार्यकर्त्यांची घोषणाबाजी

■ सोलापूर

**सोलापूर** स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसचे अधिकृत उमेदवार आदित्य फत्तेपूरकर यांच्या उमेदवारी अर्जावर सूचक म्हणून असलेले पंढरपूरचे नगरसेवक नागेश भोसले यांनी आपली सही खोटी असल्याचा आक्षेप छाननीत घेतला. यानंतर फत्तेपुरकर यांचा अर्ज बाद करण्यात आला.

निवडणूक अर्जाच्या छाननीवेळी सोलापुरात मोठे नाट्य घडले.फत्तेपुरकरांच्या अर्जाला आक्षेप घेतल्यानंतर काँग्रेस आणि भाजपाचे कार्यकर्ते आमनेसामने आले. दोन्ही बाजूंकडून एकमेकांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आल्यामुळे परिसरात काही काळ प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी यावर प्रतिक्रिया देताना म्हटले आहे की, हा आरोप खोटा असून, आमच्याकडे याचे पुरावे आहेत.

जिल्हाधिकारी छाननी कक्षात हा वाद सुरू असतानाच, बाहेर मोठ्या संख्येने जमा झालेले काँग्रेस आणि भाजपा कार्यकर्तेएकमेकांविरोधात उभे ठाकले. भाजपा कार्यकर्त्यांनी काँग्रेसच्या कथित गैरप्रकाराविरोधात, तर काँग्रेस कार्यकर्त्यांनी भाजपाच्या दबावाच्या राजकारणाविरोधात घोषणाबाजी सुरू केली. अखेर पोलिसांनी मध्यस्थी करत जमावाला शांत केले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. तेथे खासदार प्रणिती शिंदे आल्या. त्या म्हणाल्या की, हे भाजपाच्या दबावाचे राजकारण आहे. नागेश भोसले यांचे अपहरण करून त्यांना दबावाखाली प्रतिज्ञापत्र सादर करायला लावले. मी जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले आहे की, तुम्ही कोणत्या पक्षासाठी काम करत नाही. तेव्हा तुम्ही निर्भीडपणे याबाबत निर्णय द्या. ही निवडणूक एकतर्फी होऊ देऊ नका.

## मलेशियात १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया वापरावर बंदी

■ क्वालालंपूर

**मलेशियात** आजपासून १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडियाचा वापर करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. या बंदीच्या आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना वापरकर्त्यांचे वय पडताळणी करण्याचे बंधन घालण्यात आले. वय पडताळणी प्रणालीद्वारे १६ वर्षांखालील वयाच्या मुलांना सोशल मीडियावर अकाऊंट करण्यास प्रतिबंध केला जाणार आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

या नियमांमुळे देशभरातील ८० लाख वापरकर्त्यांना फेसबुक, इन्स्टाग्राम, टिकटॉक आणि यूट्यूबसारख्या सोशल मीडियाचा वापर करता येणार नाही. वयाची पडताळणी न करणाऱ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना १० दशलक्ष रिंगिट (२.५ दशलक्ष डॉलर) इतका दंड ठोठावला जाणार आहे. मुलांनी या नियमातून पळवाट काढली, तर मुलांच्या पालकांवर दंड आकारला जाणार आहे. या उपाययोजनांचा उद्देश मुलांना हानिकारक सामग्री, सायबरबुलिंग आणि अतिवापरास प्रोत्साहन देणाऱ्या प्रलोभनांपासून संरक्षण देणे हा आहे, असे सरकारने म्हटले आहे.

## रायगडमध्ये शिंदे गटाला धक्का तीन पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

■ रायगड

**विधान** परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले असून शिंदे गटाच्या तीन पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

रायगडमधील शिवसैनिकांमधील असंतोषाची पहिली ठिणगी कर्जत विधानसभा मतदारसंघातील खालापूर तालुक्यात पडली. खालापूर तालुका प्रमुख संदेश पाटील यांनी आपला राजीनामा थेट समाजमाध्यमांवर पोस्ट करत पक्षाच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त केली. त्यानंतर जिल्हा संघटक संभाजी जगताप यांच्यासह आणखी एका पदाधिकाऱ्यानेही पदाचा राजीनामा दिला.

रायगड जिल्ह्यात गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात थेट राजकीय संघर्ष सुरू आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा, लोकसभा तसेच इतर निवडणुकांमध्ये दोन्ही पक्ष नेहमीच एकमेकांविरोधात उभे राहिले आहेत. त्यामुळे महायुतीच्या राजकारणामुळे वरिष्ठ नेते एकत्र आले असले, तरी तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये अजूनही कट्टर राजकीय वैर कायम असल्याचे मानले जाते.

## बऱ्याच चढ-उतारानंतर शेअर बाजार वधारला

■ मुंबई

**दिवसभर** झालेल्या प्रचंड चढ -उतारानंतर भारतीय शेअर बाजाराच्या दोन प्रमुख निर्देशांकांनी आश्वासक कामगिरी केली.राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी १००.०५ अंकांच्या कमाईसह २३,४०० च्या वर बंद झाला. तर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ३८२.५० अंकांच्या वाढीसह ७४,६४९.८४ अंकांवर स्थिरावला.

आज देशांतर्गत गुंतवणूकदारांनी दिग्गज कंपन्यांमध्ये विश्वास दाखवत मोठ्या प्रमाणावर खरेदी केल्यामुळे बाजार मध्य पूर्वेतील युध्दामुळे निर्माण झालेल्या अस्थिरतेतून बाहेर पडू शकला. आजच्या सत्रातील सर्वात महत्वाची घडामोड इन्फोसिसच्या शेअरमध्ये झालेली दणदणीत वाढ ही ठरली.

## पत्नी- सासरच्यांच्या छळाला कंटाळून इंजिनीअरची रेल्वेसमोर आत्महत्या

■ अलवर

**राजस्थानमधील** अलवर जिल्ह्यातून पत्नी, सासू आणि सासऱ्यांच्या रोजच्या छळाला कंटाळून एका नामांकित आयटी कंपनीच्या सॉफ्टवेअर इंजिनीअरने दिल्ली-अजमेर वंदे भारत एक्स्प्रेससमोर उडी घेत या तरुणाने आत्महत्या केली. राजगढ-मालाखेडा रेल्वे मार्गावरील ढिगावडा स्टेशनजवळ काल ही दुर्दैवी घटना घडली.

गगन कुमार अग्रवाल (४४) असे आत्महत्या केलेल्या इंजिनीअरचे नाव असून ते अलवर शहरातील मोती नगरमध्ये राहत होते. गगन हे आयबीएम या नामांकित आयटी कंपनीमध्ये सॉफ्टवेअर इंजिनीअर होते. अलवर-राजगढ मार्गावर ढिगावडा आणि पूनखर यांच्या इथल्या रेल्वे फाटकाजवळ एका व्यक्तीचा ट्रेनखाली चिरडून मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी पोहोचले. या अपघातात गगन यांचा जागेवरच मृत्यू झाला होता. पोलिसांनी त्यांची झडती घेतली असता, त्यामध्ये मिळालेल्या कागदपत्रांवरून त्यांची ओळख पटली. त्यानंतर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन रुग्णालयात पाठवून त्यांच्या कुटुंबियांना घटनेची माहिती दिली. गगन यांचे सासर उत्तर प्रदेशातील झाशी येथे आहे. गगन यांचे मोठे भाऊ निर्मल कुमार अग्रवाल आणि मित्र ललित मोहन गुप्ता यांनी सासरच्यांवर अत्यंत गंभीर आरोप केले आहे.


# नवाकाळ शब्दकोडे-१६२५

**आडवे शब्द –**

१. खोल्यांची रांग, चाळ, छावणी ३. इतरांवर अवलंबून किंवा अंकित ६. ज्वारी-बाजरीचा मुख्य पदार्थ ९. असत्य, अनृत ११. भार्या, बायको १२. पाठीच्या कण्यातील हाड १३. इंग्लंडमध्ये असलेला भारताचा मौल्यवान हिरा १५. घाणेरडे १७. धाकटी बहीण १८. आगाऊ घेतलेली रक्कम, उचल १९. कंथा, वाकळ २०. ऐट, तोरा २२. पावसाळ्यात कधीकधी क्षितिजावर दिसणारी सप्तरंगी कमान २४. बैरागी २५. संतोष २७. हत्ती, कुंजर २८. अहंकार, गर्व २९. शैली, ढब ३१. प्रवाशांचा तांडा ३२. ठार करणे ३४. खरबरीत ३६. कैरीचे शीतपेय ३७. गरज, जरूरी ३९. कास्तकार, कृषीवल ४०. ध्वनिवर्धक, भोंगा ४१. समूहाचे, सामुदायिक ४२. आच्छादन ४४. आवेश, अवसान ४५. भीषण ४६. मित्र, सहचर ४९. ढोंग, लबाडी ५०. अभिमानी, ब्रीद जपणारा ५३. वरिष्ठांना दिलेली भेटवस्तू ५४. राग, क्रोध ५५. एक किंवा अनेक बिऱ्हाडे असलेले जुने घर ५६. महासागरात आढळणारा महाकाय सस्तन मासा ५८. झोपेतून उठणे ५९. नवरी ६०. लहान, छोटा ६१. करुणा ६२. मोठा आवाज, स्फोट ६३. कीव ६४. फुटाणे ६६. लोकरी गळपट्टा ६८. गृहकलह ६९. न समजणारे, गूढ ७०. बोकड, बकरा ७१. एक अत्तर; हिरवे सरबत ७२. भावाची बायको ७४. धांदल, फजिती ७६. खोटा आरोप ७८. अत्तराचा बोळा ७९. पाषाण ८१. खाबू, भ्रष्ट ८२. जमीन ८४. उन्हाळ्यात शिंदीच्या झाडापासून मिळणारे शीतपेय ८५. मैत्रीण, सखी ८६. अचूक, बिनतोड ८८. घाई ९०. शेराचा एक चतुर्थांश ९१. राजवट, कारकीर्द ९४. केळी ९५. वाकडी नजर, अवकृपा ९६. मनःपूर्वक, मनापासून ९७. शंकर, महादेव ९८. कुरूप ९९. पुढारी, म्होरक्या १००. निराळा, न्यारा १०१. मोठा विस्तार असलेला वृक्ष

**उभे शब्द –**

१. श्रीकृष्णाचा मोठा भाऊ २. निशा ३. आजीचे, आजोबांचे वडील ४. शुद्ध पौर्णिमेची पंधरावी तिथी ५. अप्रिय, नापसंत ६. सूर्य, रवी ७. कटिसूत्र ८. शैत्य, गारवा १०. तारेचा आखूड खिळा १२. माणूस १४. भक्त प्रल्हादचा पिता १५. तुच्छतेची वागणूक १६. यज्ञातील पवित्र इंधन १७. धाकटा भाऊ १८. रजनीकर, चंद्र २१. लग्नाच्या वेळी वऱ्हाडींना उतरण्यासाठी दिलेल्या खोल्या २२. लक्ष्मी २३. आच, झळ २४. संचय, संग्रह २६. हार, माळ २८. तान्हुले २९. रोम, लोम ३०. बगळा ३३. पैशाचा माज दाखवणारा ३५. फसवणे, लुबाडणे ३६. अस्ताव्यस्त पडलेल्या वस्तू ३७. मनातील द्वेष ३८. ज्यूटचे कापड ४३. नाजूक भाग, जिव्हार ४४. हेळसांड, दुर्लक्ष ४५. राखाडी रंग; कडक शिस्तीचा ४७. बावर्ची ४८. हेतू, प्रयोजन ४९. थांबवणे, रोखणे ५१. रानात पसरलेली आग ५२. शंकराचे उपासक ५४. सोबत ५६. ययाती राजाची पत्नी ५७. ययाती राजाची मुलगी; चंद्राची सतरावी कला ५८. घायाळ, जखमी ६०. स्वच्छता ६३. किल्ला ६४. मनाची चंचल स्थिती ६५. चांदी, रूपे ६६. यज्ञ ६७. आवाज, ध्वनी, नाद ६९. पार्वती ७०. चिरंजीवित्व, मृत्यूपासून सुटका ७३. बर्फ ७५. अवैध ७७. लक्षावधी ७९. रव्याचा गोड पदार्थ, हा प्रसादात वापरतात. ८०. नर्तन, नृत्य ८१. एक ज्वालाग्राही पदार्थ, लाक्षा ८२. बाहू, हात ८३. ओळ, रांग ८४. शांतता, स्तब्धता ८५. समुदाय, समूह ८७. पार, पल्याड ८९. अंमल, सत्ता ९०. वृक्ष ९१. डोळ्यांना न दिसणारा, दिसेनासा ९२. धुके ९३. दानशील वृत्तीचा ९३. कंजूष ९७. नेहमी, नित्य •



**नवाकाळ कोडे क्रमांक १६२४ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. अमाप ५. गोठा ७. प्रघात ९. मामुली ११. अंबुज १३. तगादा १४. वकूब १६. यात्रा १८. मलीन १९. कर २१. जलचर २३. आमदार २४. तापट २६. आवाहन २८. पैदा २९. दास ३१. आटा ३२. टाचण ३३. नरद ३५. रमताराम ३८. पिता ३९. रापण ४०. विप्र ४१. लता ४३. जून ४४. हिमटा ४६. आमटी ४८. दामोदर ४९. शत ५०. विषाद ५१. क्षौर ५२. पसायदान ५५. लव ५६. मदार ५८. सुमन ६०. साफ ६२. खटारा ६४. नरम ६५. रत्तल ६६. टवाळी ६८. फकीर ७०. माष ७१. शिकेकाई ७३. अमृत ७५. वीड ७७. वरुण ७९. झबले ८१. टच ८३. गवार ८५. निगा ८६. खिजवणे ८८. रिवाज ९०. हिवाळी ९१. पाणीदार ९३. अकारण ९४. सीताफळ ९५. रस ९७. असीम ९९. नक्षी १००. नमन १०२. शामत १०३. नवती १०४. नस १०७. जिवलग १०९. पाम ११०. वरी ११२. डगला ११३. रघुनायक ११४. अवकळा ११५. सरिता

**उभे शब्द** : १. काबुली ३. मातकट ४. पगार ६. ठाव ७. प्रबल ८. तयार १०. मुद्दाम ११. अंमलदार १२. जनता १५. कूजन १७. कोरडा २०. कावा २२. चणचण २३. आदानप्रदान २५. पसारा २६. आटापिटा २७. हल्ला ३०. समजूतदार ३२. टापटीप ३४. दलदल ३६. तान ३७. महिषासूर ३९. राम ४२. तारवट ४५. मदमत्त ४६. आरसा ४७. चोयटा ४९. शमन ५३. साखळी ५४. दारा ५७. रममाण ५९. नल ६१. फटका ६३. बाकी ६७. वाईट ६८. फतवा ६९. रवी ७२. केळवण ७४. मृगजळ ७६. डहाळी ७८. रुमणी ७९. झगा ८०. लेखिका ८२. चरितार्थ ८४. रहिवासी ८५. निरसन ८७. जरब ८९. वाफ ९१. पावनखिंड ९२. दार ९३. अटन ९६. उमग ९७. अतीव ९८. मन १०१. मटार १०२. शालक १०३. नमक १०५. सरोता १०६. शिला १०७. जिना १०८. वय १०९. पाव १११. रीस

# पार्थ पवारांची शिष्टाई यशस्वी
# सुनील टिंगरेंची अखेर माघार

पान १ वरून

सुनील टिंगरे यांनी म्हटले आहे की, पक्षाने जो निर्णय घेतला आहे, तो सगळ्यांनी मान्य केला आहे. पक्ष मला कुठेही वाऱ्यावर सोडणार नाही. पक्षात अशी वेळ येते, जेव्हा काही निर्णय घ्यावे लागतात. संजय काकडे यांनी पक्ष प्रवेश केला आहे. त्यांना अधिकार आहे. पक्ष कार्यालयात येण्याबाबत मला कोणाचाही फोन आलेला नाही. मी दादांचा कार्यकर्ता आहे. मी शब्द पाळतो. पुढील काळात योग्य तो सन्मान राखला जाईल, असे मला पक्षाने सांगितले आहे.

## काकडेंच्या अर्जावरील आक्षेप फेटाळला

निवडणूक अर्जांच्या आजपासून सुरू झालेल्या छाननीत विक्रम संजय काकडे यांच्या अर्जावर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून आक्षेप घेण्यात आला. विक्रम काकडे यांनी पुणे महापालिकेचा मालमत्ता कर थकवला असल्याचा मुद्दा शरद पवार गटाने उपस्थित केला होता. मात्र, ज्या मालमत्तेचा कर थकवल्याचा मुद्दा त्यांनी केला होता, ती आपण ४ वर्षांपूर्वीच विकल्याचा खुलासा करत विक्रम काकडे यांनी संबंधित कागदपत्रे सादर केली. त्यानंतर निवडणूक आयोगाने त्यांच्या अर्जावरील आक्षेप फेटाळत त्यांना दिलासा दिला. मात्र, शरद पवार गटाने न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला आहे.

# अदानीचे विरोधक वेदांत
# फेमा प्रकरणात ईडीचे छापे

पान १ वरून

आली. परकीय चलन व्यवहारांमध्ये नियमभंग झाल्याचा संशय आल्यास ईडी फेमा कायद्यांतर्गत चौकशी करते. यातबेकायदेशीररित्या परदेशात निधी हस्तांतरित करणे, परदेशात मालमत्ता खरेदी करणे किंवा परकीय गुंतवणुकीसंबंधी नियमांचे पालन न करणे अशा बाबींचा समावेश असतो. मुंबईतील कारवाईवेळी कंपनीच्या विले-पार्ले आणि चकाला येथील कार्यालयातील कर्मचाऱ्यांना रात्रीपासून थांबवून ठेवण्यात आले होते.

असेही बोलले जात आहे की, ही कारवाई अदानी-वेदांत यांच्यात व्यावसायिक संघर्षामुळे केली जात आहे. कर्जबाजारी झालेल्या जयप्रकाश असोसिएट्स लिमिटेड या कंपनीच्या अधिग्रहणावरून उद्योगपती गौतम अदानी (अदानी समूह) आणि अनिल अग्रवाल (वेदांत) यांच्यात मोठा कॉर्पोरेट आणि कायदेशीर वाद सुरू आहे. या वादाचे मुख्य कारण म्हणजे वेदांतपेक्षा कमी बोली लावूनही अदानी समूहाने कंपनीच्या मालमत्तेच्या अधिग्रहणाची शर्यत जिंकली. जेपी समूहावर बँकांचे सुमारे ५७,००० कोटी रुपयांचे कर्ज होते. त्यामुळे कंपनी दिवाळखोरी आणि दिवाळे प्रक्रिया संहिताअंतर्गत प्रक्रियेत होती. या प्रक्रियेत अदानी समूहाने सुमारे १४,५३५ कोटी रुपयांची बोली लावली होती, तर वेदांत लिमिटेडची बोली १६,७०० ते १७,००० कोटी रुपयांदरम्यान होती. तरीही कर्जदात्यांची समितीने वेदांताची अधिक बोली नाकारून अदानी समूहाचा प्रस्ताव स्वीकारला. यामागचे कारण म्हणजे अदानी समूहाकडून रोख स्वरूपात आणि तुलनेने जलद पेमेंटची हमी देण्यात आली होती. वेदांतने या निर्णयावर आक्षेप घेत बोली प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप केला. त्यानंतर कंपनीने राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण आणि नंतर राष्ट्रीय कंपनी कायदा अपील न्यायाधिकरण यांच्याकडे धाव घेतली. मात्र, राष्ट्रीय कंपनी कायदा अपील न्यायाधिकरणने वेदांतची याचिका फेटाळून लावताना स्पष्ट केले की, कर्जदात्यांच्या समितीला त्यांच्या व्यावसायिक निर्णयक्षमतेनुसार निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यामुळे अदानी समूहाच्या अधिग्रहण प्रस्तावाला मान्यता कायम ठेवण्यात आली.

# धुळे- सुरत हायवेवर बस-ट्रक धडक

पान १ वरून - होती की, एक बस रस्त्यावरच उलटली आणि तिने अचानक पेट घेतला. बसला अचानक आग लागल्यामुळे आत अडकलेल्या प्रवाशांना बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही, मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. घटनेची माहिती मिळताच बारडोली अग्निशमन दल आणि स्थानिक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी आग आटोक्यात आणली. राज्य सरकारकडून या अपघातग्रस्तांना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी १० लाख रुपयांची मदत जाहीर केली. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त करत मृतांच्या कुटुंबीयांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी २ लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपयांची सानुग्रह मदत जाहीर केली. त्यांनी पोस्टमध्ये लिहिले की, या अपघातात ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत, त्यांच्याप्रती माझ्या संवेदना आहेत.


## जाहीर सूचना

माझे अशिल **श्री. अक्रम मकबूल शेख** हे खोली क्र. ६, ए ४५, एस. पी. शेड, देवनार म्युनिसिपल वसाहत, गोवंडी, मुंबई – ४०००४३ या जागेच्या विशेष वापरात, ताब्यात व मालकी हक्कात आहेत. ही जागा मूळ भाडेकरू श्रीम. चांद बी इब्राहीम खान यांच्याकडून माझे अशिल श्री. अक्रम मकबूल शेख यांनी दिनांक २८/०३/२०१८ रोजीच्या प्रतिज्ञापत्राद्वारे मिळवली आहे. त्यानुसार, माझे अशिल यांनी सदर जागेची भाडेकरू म्हणून नोंद मूळ भाडेकरू श्रीम. चांद बी इब्राहीम खान यांच्या नावावरून माझे अशिल श्री. अक्रम मकबूल शेख यांच्या नावावर करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडे (BMC) अर्ज केला आहे.

माझे अशिल, श्रीम. चांद बी इब्राहीम खान यांच्या नावावरून माझे अशिल श्री. अक्रम मकबूल शेख यांच्या नावावर वरील नमूद जागेचा भाडेपट्टा हस्तांतरित करण्यासंबंधी, वारसदारांनी किंवा इतर कोणत्याही व्यक्तींनी आपले हक्क किंवा आक्षेप, या नोटीसेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत, त्यांच्या दाव्यांच्या किंवा आक्षेपांच्या समर्थनार्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतींसह सादर करावेत. वरील कालावधीमध्ये, म्हणजेच या नोटीसेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून ते नमूद कालावधीच्या समाप्तीपर्यंत, सोमवार ते शुक्रवार दरम्यान सकाळी ११.३० ते दुपारी २.३० या वेळेत, माझ्या कार्यालयात दावे किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, माझे अशिल श्री. अक्रम मकबूल शेख हे वरील जागेचा भाडेपट्टा त्यांच्या नावावर हस्तांतरित करण्यास योग्य समजतील त्या पद्धतीने पुढील कार्यवाही करण्यास मोकळे असतील.

तारीख– ०३/०६/२०२६
ठिकाण– मुंबई

सही/–
**ॲड. मयूर सुभाष आढाव**
बी.एस.डब्लू., एम.एस.डब्ल्यू, एलएल. बी., डी.सी.एल.
(वकील उच्च न्यायालय, मुंबई)
**कार्यालय क्रमांक** – चाळ नं. १३, के. डी. गायकवाड नगर, शंकर मंदिर जवळ, पी. एल. लोखंडे मार्ग, चेंबूर, मुंबई – ४०००८९.



## फॉर्म क्र. यूआरसी-२

**कायद्याच्या प्रकरण XXI च्या भाग I अंतर्गत नोंदणीबद्दल सूचना देणारी जाहिरात**

[ कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ३७४(ब) आणि कंपन्या (नोंदणी करण्यास अधिकृत) नियम, २०१४ च्या नियम ४(१) नुसार ]

१. याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ३६६ च्या उपकलम (२) नुसार, केंद्रीय नोंदणी (सीआरसी), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स (आयआयसीए) येथील रजिस्ट्रारकडे अर्ज करण्यात आला आहे की, **मेसर्स एनएमआर कॅपिटल ॲडव्हायझर्स एलएलपी**, मर्यादित दायित्व भागीदारी कंपनी २०१३ च्या प्रकरण XXI च्या भाग I अंतर्गत शेअर्सद्वारे मर्यादित कंपनी म्हणून नोंदणीकृत केली जाऊ शकते.

२. कंपनीची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत –

अ) सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (पोर्टफोलिओ मॅनेजर्स) नियम आणि विनियम १९९३ आणि वेळोवेळी अंमलात येणारे असे इतर कायदयानुसार पोर्टफोलिओ व्यवस्थापक म्हणून काम करणे आणि पोर्टफोलिओ व्यवस्थापन व पोर्टफोलिओ सल्लागार सेवा प्रदान करण्याचा व्यवसाय चालवणे.

ब) सर्व प्रकारच्या निर्णय प्रक्रियेसाठी सहाय्यक ठरू शकणाऱ्या सर्व प्रकारच्या सेवांमध्ये व्यवहार करण्याचा आणि त्या प्रदान करण्याचा व्यवसाय करणे; यामध्ये व्यवसाय सहाय्य सेवा, व्यावसायिक संशोधन, वित्तीय विश्लेषण आणि विपणन सेवा, सचिवालयीन आणि प्रशासकीय सेवा आणि सर्व प्रकारच्या माहिती व सल्ला सेवा प्रदान करणे; तसेच गुंतवणूक आणि भांडवल क्षेत्रात वित्तीय सल्लागार, मार्गदर्शक आणि पर्यायी गुंतवणूक निधी म्हणून काम करणे यांचा समावेश आहे आणि याद्वारे असे घोषित करण्यात येते की, एलएलपीची उद्दिष्ट्ये भारत संघराज्यातील सर्व राज्ये आणि राज्यांमध्ये तसेच जगाच्या इतर सर्व भागांमध्ये विस्तारित असतील.

३. प्रस्तावित कंपनीच्या मसुदा निवेदनाची आणि असोसिएशनच्या लेखांची प्रत एलएलपीच्या नोंदणीकृत कार्यालयात, १३०२ ए विंग लेव्हल्स राणी सती मार्ग मालाड ईस्ट, काठियावाडी चौक खोट, डोंगरी, मालाड ईस्ट, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००९७ येथे तपासणीसाठी उपलब्ध असेल.

४. येथे सूचना देण्यात येते की, या अर्जाला आक्षेप घेणारी कोणतीही व्यक्ती सदर सूचना प्रकाशित झाल्यापासून एकवीस दिवसांच्या आत सेंट्रल रजिस्ट्रेशन सेंटर (सीआरसी), सेंट्रल इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कॉर्पोरेट अफेयर्स (आयआयसीए), प्लॉट क्र. ६, ७, ८, सेक्टर ५, आयएमटी मानेसर, जिल्हा गुरगाव - १२२०५० हरियाणा येथील निबंधकाकडे लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवू शकते आणि त्याची प्रत एलएलपीला वर नमूद केलेल्या नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकते.

**आज दिनांक ०३ जून २०२६ रोजी**

**मेसर्स एनएमआर कॅपिटल ॲडव्हायझर्स एलएलपीसाठी**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| निशित मिनेश शाह, | मिनेश गमनलाल शाह |
| नामनिर्देशित भागीदार | नामनिर्देशित भागीदार |
| डीपीआयएन : १०७२११४३ | डीपीआयएन : १०७२११४२ |


# कांद्यासाठी मविआचे पुन्हा आंदोलन

पान १ वरून

पाहत आहे का? आम्ही सहन करत राहिलो, तर शेतकऱ्यांना न्याय कधी मिळणार? सत्ता तुमच्या हातात आहे. शेतकऱ्यांसाठी ठोस भूमिका घेणे महत्त्वाचे आहे. केवळ आश्वासने देऊन प्रश्न सुटत नाहीत.

कांद्याला प्रति क्विंटल २५०० रुपये हमीभाव देण्यात यावा, यापूर्वी कमी दराने विक्री झालेल्या कांद्यासाठी प्रति किलो १५ ते २० रुपये अनुदान द्यावे, नाफेडमार्फत मोठ्या प्रमाणावर कांदा खरेदी करावा, केंद्र सरकारने किमान १० लाख टन कांद्याची खरेदी करावी तसेच निर्यात धोरणात सुधारणा करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशा मागण्या आंदोलक शेतकऱ्यांनी केल्या.

आंदोलनावेळी अहिल्यानगर येथील युवा शेतकरी राहुल बहिरट यांनी व्यासपीठावर मनोगत व्यक्त करताना विषप्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. पण व्यासपीठावरील कार्यकर्त्यांनी प्रसंगावधान राखत त्यांना वेळीच रोखल्याने मोठा अनर्थ टळला. या आंदोलनात अजित पवार गटाचे जुन्नरचे माजी आमदार अतुल बेनके यांनीही सहभाग घेत सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत आणि दिलासा देण्याची मागणी त्यांनी यावेळी केली.


पी.जे. क्र. एफसी/सीआर७/ /२०२६
दिनांकः / /२०२६
एक्झि. ३१

## सूचना

वांद्रे येथील कौटुंबिक न्यायालय क्र. ७ मध्ये
याचिका क्र. ए-३२३५/२०१३

श्री. संतोष साबाजी माळकर ... याचिकाकर्ता
विरुद्ध
सौ. सारिका संतोष माळकर ... प्रतिवादी

प्रति,
**सौ. सारिका संतोष माळकर ... प्रतिवादी**
**राह.: म्हाडा संकुल,**
**घोडपदेव रोड, फेर बंदर,**
**राम भाऊ भोसले मार्ग,**
**इमारत क्र. ४ए, १० वा मजला,**
**मुंबई ४०००३३.**

नोंद घ्यावी की, उपरोल्लेखित याचिकाकर्ता यांनी हिंदू विवाह कायदा, १९५५ च्या कलम १३(१) (ia) अंतर्गत तुमच्याविरुद्ध घटस्फोटाची याचिका दाखल केली आहे.

पुढे नोंद घ्यावी की, याचिका **वांद्रे येथील कौटुंबिक न्यायालय क्र. ०७, मुंबई** मध्ये किंवा वांद्रे येथील कौटुंबिक न्यायालय मुंबई मधील सदर न्यायालय क्र. ७ चा नियुक्त पदभार असलेल्या कोणत्याही इतर पीठासीन माननीय कौटुंबिक न्यायाधीश यांच्यासमक्ष **दि. ८ जून, २०२६ रोजी स. ११.००** (ठिक) वाजता सुनावणी आणि अंतिम निवाड्याकरिता निश्चित करण्यात आली आहे, ज्या वेळेस तुम्ही व्यक्तिशः उपस्थित राहणे आणि तुमचे लेखी निवेदन सादर करणे आवश्यक आहे आणि तुम्ही असे करण्यास कसूर केल्यास, माननीय न्यायाधीश-कौटुंबिक न्यायालय क्र. ७ तुमच्या विरुद्ध एकतर्फी सदर याचिकेची सुनावणी सुरु करतील आणि त्यावरील निवाडा जाहीर करतील.

ही सूचना श्री. एस. बी. इंगुलकर, न्यायाधीश, न्यायालय क्र. ७ यांच्याद्वारे दि. १७.०४.२०२६ रोजी आदेशित केली.

**दिनांक २० मे, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी आणि सदर न्यायालयाच्या शिक्क्यानिशी पारित.**

शिक्का

सही/-
**उप निबंधक.**
**कौटुंबिक न्यायालय मुंबई,**
वांद्रे कुर्ला संकूल,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.



## ई–निविदा सूचना

महावितरण

स्थापत्य विभाग जळगाव या कार्यालयाकरीता ३ वर्षासाठी भाडेत्तवावर वाहन पुरविणे करिता (जसे की डीझेल/पेट्रोल/CNG/E-vehicle वरती चालणारी Indigo, Swift Dzire, Tour S, Amaze Xcent व तत्सम ) ई–निविदा क्र. एसईसी / कल्याण /vehicle/ई–टि–०९/२०२६–२७ कंपनीच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेली आहे. कामाची अंदाजित रककम रु. १३.६३ लक्ष असुन बयाणा रककम रु. १३,६३७/– ईतकी आहे. ई–निविदेचा विक्री कालावधी दि. ०३.०६.२०२६ ते ११.०६.२०२६ पर्यंत आहे. तसेच ई–निविदा ऑनलाईन पध्दतीने सर्व तपशीलासह सादर करण्याची वेळ दि. ११.०६.२०२६ रोजी दुपारी १३.०० वाजेपर्यंत आहे. सर्व तपशिल कंपनीच्या https://etender.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदेबाबतची शुध्दीपत्रके ही फक्त कंपनीच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येतील याची निविदाकारांनी नोंद घ्यावी.

संपर्क अधिकारी– कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य मंडळ, कल्याण. भ्रमणध्वनी– ८८७९६२०८६० व ईमेल– secivkalyan@mahadiscom.in

**अधीक्षक अभियंता (स्था) स्थापत्य मंडळ कल्याण**



## जाहीर सूचना

ए) दी बॉम्बे शॉर्टहॅन्ड रायटर्स' असोसिएशन,
पी.टी.आर. नं. एफ - ६८१ (मुंबई),
पत्ता : ३/३, कैलास कृपा, स्कीम ६, रस्ता क्र. १, सायन (पूर्व), मुंबई- ४०० ०२२.
अर्जदार ट्रस्टी :
१. श्री. ए. गोपालकृष्णन
२. श्री. एस. बी. घाटे

बी) दी साऊथ इंडियन असोसिएशन
पी.टी.आर. नं. एफ - ४० (ठाणे)
पत्ता : एसआयए स्कूल बिल्डींग, कोपर रोड, शास्त्री नगर, डोंबिवली (पश्चिम), ठाणे - ४२१ २०२.
अर्जदार ट्रस्टी :
१. श्री. के. व्ही. रंगनाथन
२. श्री. एम. गोपालकृष्णन

महाराष्ट्र सार्वजनिक न्यास कायदा,१९५० चे अनुच्छेद ५० (ए) (२) च्या तरतुदींनुसार याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, दी बॉम्बे शॉर्टहॅन्ड रायटर्स असोसिएशन, पी.टी.आर. नं. एफ - ६८१ (मुंबई) अंतर्गत नोंदणीकृत, त्यांच्या कार्यालयाचा पत्ता : ३/३, कैलास कृपा, स्कीम ६, रस्ता क्र. १, सायन (पूर्व), मुंबई- ४०० ०२२ यांनी एकमताने दी साऊथ इंडियन असोसिएशन पी.टी.आर. नं. एफ-४० (ठाणे) अंतर्गत नोंदणीकृत यांच्यासमवेत विलीनीकरणाचा निर्णय घेतला आहे.

प्रस्तावित विलीनीकरणासंदर्भात तुमच्या काही हरकती असल्यास त्या - डीसी असोसिएट्स, बाणेश्वर सदन, तळमजला, खोली क्र. ०७, ससमिरा कॉलेज लेन, वरळी डेपो, विठ्ठल मंदिराच्या पुढे, वरळी, मुंबई- ४०० ०३० या पत्यावर सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून ३० दिवसांच्या आत लिखित स्वरूपात सादर कराव्यात अन्यथा प्रस्तावित विलीनीकरणावर निर्णय घेण्यात येईल व त्याच्या गुणवत्तेच्या आधारावर प्रक्रीया पूर्ण करण्यात येईल.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०३.०६.२०२६**

सही/-
ट्रस्टींद्वारे,
**दी बॉम्बे शॉर्टहॅन्ड रायटर्स असोसिएशन व दी साऊथ इंडियन असोसिएशन करिता**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (MHADA) च्या अंतर्गत असलेल्या, 'चारकोप (१) सहयोग सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित' (नोंदणी क्र. BOM/HSG/11440/1997), भूखंड संकुल क्र. १३६, आर.एस.सी. १३, सेक्टर १, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई - ४०००६७ या संस्थेमधील सदनिका/घरकुल क्रमांक डी-४६ (D-46) ही जागा मूळ लाभार्थी श्री. मोहन गंगाराम घाडी यांच्या मालकीची होती.

सदर सदनिकेचे हस्तांतरण खालील खरेदी-विक्री साखळीनुसार (Chain of Documents) झालेले आहे:

१. श्री. मोहन गंगाराम घाडी यांनी ही सदनिका श्री. योगेश दत्ताराम पवार यांना दि. ०८/०८/२००१ रोजी विक्री केली.

२. श्री. योगेश दत्ताराम पवार यांनी ही सदनिका श्री. जयेश सोहिलालाल देवडा यांना दि. १४/०९/२००२ रोजी विक्री केली.

३. श्री. जयेश सोहिलालाल देवडा यांच्याकडून 'दि सनी को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड' (नोंदणी क्र.बीओएम/डब्ल्यूआर/आरएसआर/सीआर/एनव्ही/एसआर/१७०४/सन ९२-९३) च्या संचालक मंडळाने सदर सदनिका दिनांक २५/०२/२००५ रोजी खरेदी खता द्वारे (दस्त क्र. ८४३६) खरेदी केली आहे.

आता, मा. मिळकत व्यवस्थापक (पश्चिम), मुंबई मंडळ, म्हाडा यांच्या पत्र क्र. मि.व्य./डब्ल्यु/ मुं.मं./१२२९/२६, दिनांक २८/०४/२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या ना-देय प्रमाणपत्राच्या (NOC) आधारे, सदर सदनिका व संस्थेचे भाग प्रमाणपत्र (Share Certificate) क्रमांक ३५ हे 'दि सनी को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड' चे अधिकृत संचालक श्री. मधुकर वामन गायकवाड यांच्या नावे हस्तांतरित करून मिळण्यासाठी संस्थेकडे अर्ज सादर करण्यात आला आहे.

जुन्या खरेदी-विक्री व्यवहारांच्या अनुषंगाने, सदर सदनिकेच्या हस्तांतरणावर किंवा भाग प्रमाणपत्र (Share Certificate) श्री. मधुकर वामन गायकवाड (तर्फे: दि सनी को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.) यांच्या नावे करण्यास कोणाचेही जुने व्यवहार, गहाणखत, लिन (Lien), अन्नवस्त्र, वारसाहक्क, मृत्युपत्र, कोर्टाचा वाद, करारनामा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे काहीही आक्षेप, दावा वा हक्क असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत आपली हरकती / आक्षेप खालील पत्त्यावर योग्य त्या कायदेशीर कागदपत्रांच्या व पुराव्यांच्या पुराव्यासह लेखी स्वरुपात नोंदवावेत.

जर मुदतीत कोणाचेही आक्षेप किंवा दावे प्राप्त झाले नाहीत, तर सदर सदनिकेचे टायटल निर्वेध (Clear) आहे असे समजून 'चारकोप (१) सहयोग सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित' म्हाडाच्या व सहकारी कायद्याच्या नियमांनुसार सदर सदनिकेचे व भाग प्रमाणपत्राचे हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करेल. त्यानंतर आलेले कोणतेही आक्षेप किंवा दावे संस्थेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्याची दखल घेतली जाणार नाही.

दिनांक: ३.६.२०२६
स्थान: मुंबई

पत्ता :
माननीय अध्यक्ष / सचिव,
चारकोप (१) सहयोग सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सदनिका क्र. १३६/डी-४६,
सेक्टर १, चारकोप,
कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०००६७.

सही/-
ॲड. संतोष महादेव पितळे
प्लॉट नं. १०, रूम नं. डि/८,
कल्पतरू को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड,
गोराई, बोरीवली (पश्चिम),
मुंबई - ४०००९१.


# महाराष्ट्र सरकारने नरिमन पॉईंटच्या एअर इंडिया इमारतीचा ताबा घेतला

पान १ वरून - सर्व शासकीय कार्यालये एअर इंडिया इमारतीत स्थलांतरित केल्यास सरकारला दरवर्षी सुमारे २०० कोटी रुपयांच्या भाड्याची बचत होईल. ही इमारत प्रत्यक्ष वापरासाठी तयार करण्यास सहा महिन्यांहून अधिक कालावधी लागण्याची शक्यता आहे. इमारतीतील लिफ्ट सध्या बंद असून मोठ्या प्रमाणात अंतर्गत दुरुस्ती व नूतनीकरणाचे काम करावे लागणार आहे. ५० वर्षांहून अधिक जुनी असल्याने केंद्रीय वातानुकूलन (एअर कंडिशनिंग) व्यवस्थाही कार्यरत नाही. २०२२ मध्ये तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्कालीन केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांची भेट घेऊन ही इमारत महाराष्ट्र सरकारला देण्याची विनंती केली होती. या इमारतीच्या खरेदीसाठी महाराष्ट्र सरकारसोबत भारतीय रिझर्व्ह बँकदेखील इच्छुक होती.

नवाकाळ
• मुंबई । बुधवार ३ जून, २०२६ • पान -८

# वैभव सूर्यवंशीच्या तडाखेबंद यशाचा आयआयएम इंदूर अभ्यास करणार



**इंदूर -** देशातील प्रतिष्ठीत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, इंदूर ही संस्था आयपीएल गाजवणारा १५ वर्षीय क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशीचा आपल्या केस स्टडीमध्ये समावेश करणार आहे. 'वैभव मॉडेल'वर देशातील पहिली मल्टी-डिसिप्लिनरी अभ्यास होणार आहे. यात क्रीडा-मानसशास्त्र-व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञ एकत्र येऊन लहान वयात सक्सेस फॉर्म्युलाचे सूत्र शोधतील. आयआयएमचे संचालक हिमांशू रॉय म्हणाले की, या अभ्यासात वैभवच्या कामगिरीचे विश्लेषण करण्यासोबतच, लहान वयात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रतिभावंतांना घडवणाऱ्या सामाजिक, मानसिक, कौटुंबिक आणि संस्थात्मक घटकांचा सखोल अभ्यास केला जाईल.

## आयात शुल्क हटताच कापसाच्या दरात ८,५०० रुपयांपर्यंत घसरण

■ मुंबई

**केंद्र** सरकारने कापसावरील ११ टक्के आयात शुल्क पुढील पाच महिन्यांसाठी रद्द करण्याचा निर्णय घेतल्यानंतर देशांतर्गत कापूस बाजारावर त्याचा मोठा परिणाम झाल्याचे दिसत आहे. या निर्णयानंतर कापसाच्या दरात १,००० रुपयांची घसरण झाली असून, त्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.



कापसाचा बाजारभाव सुमारे ९,५०० रुपयांवरून ८,५०० रुपयांपर्यंत घसरला आहे. त्यामुळे कापूस साठवून ठेवलेल्या तसेच विक्रीच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. कापूस उत्पादक संघटनांच्या मते, जागतिक तसेच देशांतर्गत बाजारातील कापसाचे दर जवळपास समांतर असताना आयात शुल्क हटविण्याची गरज नव्हती. वस्त्रोद्योग क्षेत्रातील मागणी लक्षात घेऊन सरकारने हा निर्णय घेतल्याचा आरोप शेतकरी संघटनांकडून केला जात आहे. या निर्णयामुळे बाजारात मानसिक दबाव निर्माण झाला आहे.

## दुर्गराज रायगडावर ६ जूनला ३५२ वा शिवराज्याभिषेक

■ रायगड

**छत्रपती** शिवाजी महाराजांच्या शौर्य, पराक्रम आणि हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेचा ऐतिहासिक क्षण पुन्हा अनुभवण्यासाठी दुर्गराज रायगड सज्ज झाला आहे. येत्या ६ जून रोजी रायगडावर ३५६ वा शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात येणार आहे. ६ जून १६७४ रोजी रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला आणि हिंदवी स्वराज्याची अधिकृत स्थापना झाली. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी रायगडावर शिवराज्याभिषेक दिन साजरा केला जातो. यंदाही ५ आणि ६ जून रोजी विविध सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ६ जून रोजी ऐतिहासिक दिनांकानुसार, तर २६ जून रोजी तिथीनुसार शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला जाणार आहे. ६ जून रोजी सकाळी ९.३० वाजता शिवछत्रपतींच्या पालखीचे राजसदर येथे आगमन होईल. त्यानंतर सकाळी १० वाजता खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते शिवछत्रपतींच्या उत्सवमूर्तीवर मुख्य अभिषेक करण्यात येणार आहे.

## 'लाडक्या भावां'ना दणका सरकार पैसे वसूल करणार

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ मुंबई

**सरकारची** फसवणूक करून बेकायदेशीरपणे 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ घेणाऱ्या पुरुषांना सरकारने चांगलाच दणका दिला आहे. या पुरुषांनी गेले सुमारे दीड वर्षे दरमहा दीड हजार रुपये याप्रमाणे सरकारकडून मिळवलेले पैसे सरकार आता वसूल करणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज ही माहिती दिली.

लाडकी बहीण योजनेतील ८० लाख अपात्र महिलांना वगळल्यावरून विरोध करत असलेल्या टीकेला उत्तर देताना फडणवीस यांनी योजनेची सविस्तर माहिती दिली. त्याप्रसंगी फडणवीस म्हणाले की, राज्याच्या खर्च केलेल्या एकेका पैशाचा सरकारला हिशेब द्यावा लागतो.

'कॅग' ही केंद्रीय संस्था सरकारकडून हिशेब घेते. लाडकी बहीण योजनेचा हिशेब देताना आम्हाला योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांकडून योजनेच्या निकषात बसत असल्याचे कागदोपत्री पुरावे घेणे आवश्यक होते. कारण कागदपत्रांसह 'कॅग'ला माहिती द्यायची होती. योजना सुरू केली, तेव्हा सर्व कागदपत्रे सादर करण्यात वेळ वाया जाऊ नये म्हणून आम्ही महिलांना त्यांचे अर्ज स्वयंप्रमाणित करण्यास सांगितले होते. याचा अर्थ अर्जामध्ये दिलेली माहिती खरी आहे, अशी हमी अर्जदार महिलांनी सरकारला दिली होती. आता आम्ही फक्त त्या माहितीच्या अनुषंगाने पुरावे जमा केले. त्यासाठी रेशन कार्डवरील नोंदी, वाहन खरेदीच्या नोंदी, वेतन, सरकारी नोकरी, आयकर परतावा, » पान ५ वर

## 'हुतात्मा'चे अध्यक्ष वैभव नायकवडी यांचा राजीनामा

■ वाळवा

**तालुक्यातील** पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष वैभव नायकवडी यांनी अखेर आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी गेल्या ४२ दिवसांपासून कारखान्यावर सभासद व शेतकऱ्यांचे तीव्र आंदोलन सुरू होते.

राजीनाम्यानंतर पत्रकारांशी बोलताना वैभव नायकवडी म्हणाले की, हुतात्मा संकुलातील सर्व संस्था चांगल्या चालाव्यात हाच आमचा प्रामाणिक हेतू आहे. आज राज्यभर सहकार क्षेत्रात हुतात्माचा एक वेगळा आदर्श आहे आणि त्याला कसलेही गालबोट लागू नये, यासाठीच मी कारखान्याच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देत आहे. माजी मंत्री सदाभाऊ खोत आणि सांगली जिल्हा बँकेचे संचालक सी. बी. पाटील यांच्या उपस्थितीत शुक्रवारी झालेल्या बैठकीत राजीनामा देण्याचे ठरले होते. त्यानुसार आज कारखान्याच्या कार्यकारी संचालकांकडे राजीनामा सुपूर्द केला आहे. यापुढेही संकुलाच्या प्रगतीसाठी कार्यरत राहणार असून, सर्व शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त ऊस नोंदी करून हुतात्माला सहकार्य करावे.

## एकत्र येण्याच्या वक्तव्यानंतर सत्तार-दानवेंची आज गळाभेट

■ छत्रपती संभाजीनगर

**शिंदे** गटाचे आमदार अब्दुल सत्तार यांनी कालच भाजपाकडून शिंदे गटाचे खच्चीकरण सुरू असल्याचे वक्तव्य केले होते. त्यानंतर उबाठा आमदार अंबादास दानवे यांनी दोन्ही शिवसेना पुन्हा एकत्र यायला हव्यात, असे म्हटले होते. त्यानंतर आज सकाळी अब्दुल सत्तार आणि अंबादास दानवे यांची अचानक समृद्धी महामार्गावर भेट झाली. यावेळी दोन्ही नेत्यांनी गळाभेट घेतली. हा योगायोग होता की, आणखी काही, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

अब्दुल सत्तार हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेण्यासाठी मुंबईकडे निघाले होते, तर अंबादास दानवे शिर्डीकडे जात होते. समृद्धी महामार्गावर एका ठिकाणी दोन्ही नेत्यांच्या वाहनताफ्यांची समोरासमोर भेट झाली. यावेळी दोघेही गाडीतून उतरले आणि त्यांनी एकमेकांची गळाभेट घेत संवाद साधला. या भेटीचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल झाले असून, त्यावरून विविध राजकीय तर्कवितर्कांना उधाण आले आहे. छत्रपती



संभाजीनगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची जागा भाजपाच्या वाट्याला गेल्यानंतर अब्दुल सत्तार यांच्या पुत्राने खळबळ उडाली होती. भाजपा शिवसेनेचे मुंडके उडवण्याचे काम करत आहे, असा थेट आरोप त्यांनी केला होता. त्यानंतर सत्तार आणि दानवे यांच्या गळाभेटीमुळे चर्चा सुरू झाली आहे.

## सीबीएसई पुनर्मूल्यांकन पोर्टलवर सायबर हल्ल्यांचा मारा! १५ लाख हिट्स

■ नवी दिल्ली

**सीबीएसई** म्हणजेच केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुनर्मूल्यांकन पोर्टलवर आज सायबर हल्ल्यांचा मोठा मारा झाल्याचा दावा मंडळाने केला आहे. पोर्टल सुरू झाल्यानंतर पहिल्याच काही तासांत १६ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज दाखल केले. त्याचवेळी पोर्टलवर अनेक सायबर हल्ल्यांचे प्रयत्न झाल्याची माहिती सीबीएसईने दिली. सीबीएसई पोर्टलवर पुरसे सुरक्षा नसल्याने सायबर हल्ला सहज होऊ शकतो असे १९ वर्षाच्या निसर्ग या तरुणाने आधीच स्पष्ट केले होते.

सीबीएसईच्या निवेदनानुसार, सर्वात गंभीर प्रकार म्हणजे 'डिनायल-ऑफ-सर्व्हिस' हल्ल्याचा प्रयत्न होता. या हल्ल्यादरम्यान अवघ्या दोन मिनिटांत पोर्टलवर सुमारे १५ लाख हिट्स नोंदवण्यात आल्या. याशिवाय, पोर्टलवरील फाइलमध्ये अनधिकृत प्रवेश मिळवण्यासाठी १ लाखांहून अधिक प्रयत्न झाल्याचेही प्रणालीने शोधून काढले. सायबर हल्ल्यांचे प्रयत्न असूनही पोर्टल सुरळीत कार्यरत राहिले आणि विद्यार्थ्यांचे अर्ज स्वीकारण्याचे काम अखंडपणे सुरू असल्याचे सीबीएसईने स्पष्ट केले. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सध्या हे पोर्टल एकाच वेळी ८ हजारांहून अधिक वापरकर्त्यांचा भार सांभाळण्यास सक्षम आहे.

## लोकांच्या आमच्याकडून अवाजवी अपेक्षा अलाहाबाद हायकोर्टाच्या न्यायाधीशांची खंत

■ लखनौ

**न्यायालयीन** दिरंगाईवरून होणाऱ्या टीकेने व्यथित झालेल्या अलाहाबाद उच्च न्यायालयातील एका न्यायाधीशांनी सुनावणीदरम्यान आपले दुःख बोलून दाखवले. खटल्यांची संख्या व न्यायाधीशांचे व्यस्त प्रमाण याकडे बोट दाखवत, आम्ही सुपर कॉम्प्युटर किंवा सुपर रोबोटप्रमाणे काम करावे, अशी अपेक्षा लोक करतात, अशी खंत न्यायाधीशांनी व्यक्त केली.

अलाहाबाद उच्च न्यायालयासारख्या न्यायालयांमध्ये दाखल खटल्यांची संख्या प्रचंड आहे. तुलनेने न्यायालये व न्यायाधीशांचे प्रमाण



खूप कमी आहे. त्यामुळे एकेका न्यायाधीशाकडे एका दिवसाला ४००, ५००, ६०० आणि कधी कधी तर ८०० खटले सुनावणीस येतात. न्यायालयीन प्रक्रियेला वेळ लागतो. कधी कधी काही वर्षे, तर कधी कधी काही दशकेदेखील लागतात. अशाप्रकारे कामाचा प्रचंड बोजा असलेल्या न्यायाधीशांनी यंत्रमानवासारखे सतत काम करत राहावे, सुपर रोबोट, सुपर कॉम्प्युटरसारखे काम करावे, अशी अपेक्षा केली जाते, असे न्या. क्षीतिज शैलेंद्र म्हणाले. एका सरकारी शाळेतील शिक्षकाच्या थकीत वेतनाशी संबंधित खटल्याची सुनावणी आज न्या. क्षीतिज शैलेंद्र यांच्या न्यायासनासमोर झाली.

## महाराष्ट्रात 'भारत टॅक्सी' सरकारचा हिरवा कंदील

■ मुंबई

**राज्यातील** ॲप-आधारित टॅक्सी सेवांना पर्याय म्हणून सहकारी तत्त्वावरील 'भारत टॅक्सी' सेवेला महाराष्ट्र सरकारने हिरवा कंदील दाखवला आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे 'भारत टॅक्सी' सेवा सुरू करण्यासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आज मंत्रालयात पार पडली. या बैठकीत ऑनलाईन सहकारी टॅक्सी ग्रीगेटर सेवांसाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या बैठकीला परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार रविंद्र चव्हाण यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत 'सहकार टॅक्सी को-ऑपरेटिव्ह लिमिटेड (भारत टॅक्सी)' या प्रस्तावित सेवेसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. या उपक्रमामुळे लाखो चालकांना आर्थिक स्थैर्य, सामाजिक सुरक्षा आणि मालकी हक्काच्या संधी मिळणार असून मुंबईनंतर पुणे व नागपूरमध्येही ही सेवा सुरू करण्याचे नियोजन आहे.

## वरळी पोलीस निवासस्थानाच्या दुरुस्तीमध्ये मोठा गैरव्यवहार

कंत्राटदार संघटनेची आयुक्तांकडे तक्रार

■ मुंबई

**वरळीतील** पोलीस निवासस्थानाच्या देखभाल-दुरुस्तीमध्ये मोठा आर्थिक गैरव्यवहार झाला आहे, अशी तक्रार मुंबई काँट्रॅक्टर्स असोसिएशनने मुंबई पोलीस आयुक्तांकडे केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता आणि मुंबई पोलीस विभागाच्या कक्ष ८ चे अधिकारी यांनी संगनमताने हा गैरव्यवहार केला, असा असोसिएशनचा आरोप आहे. या गैरव्यवहाराची चौकशी करावी, अशी मागणी असोसिएशनने केली आहे.

असोसिएशनचे अध्यक्ष मुकुंद काकड यांनी यासंदर्भात पोलीस आयुक्तांना पत्र लिहिले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच पोलीस अधिकारी कंत्राटदारांकडून ३ टक्के कमिशन घेऊन कामे मंजूर करतात. एकाच इमारतीची किंवा एकाच स्वरूपाच्या कामांची एकत्रित निविदा न काढता जाणीवपूर्वक तुकड्या तुकड्यांमध्ये २० लाख रुपयांपेक्षा कमी रकमेच्या निविदा काढल्या जातात. अनेकदा प्रत्यक्षात काम न करता कागदोपत्री कामे पूर्ण झाल्याचे दाखवून देयके काढून ती मंजूर केली जातात, असा आरोप काकड यांच्या या पत्रात करण्यात आला आहे. मागील काही वर्षांत बांधकाम विभागाच्या ५०० ते ७०० कोटी रुपयांच्या कामांना नियमबाह्य मंजुरी देण्यात आली आहे. २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये ज्या इमारतींसाठी मोठ्या प्रमाणात निविदा काढून कामे करून घेण्यात आली, त्या कामांची अंतिम बिले आजही प्रलंबित आहेत.

## राज्यातील रस्ते सुधारणांसाठी ४,३०० कोटींच्या कर्जास मंजुरी

■ मुंबई

**राज्यातील** रस्ते विकास आणि पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी राज्य मंत्रिमंडळाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत रस्त्यांच्या कामांसाठी आशियाई इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँकेकडून ५०० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स (सुमारे ४,३०० कोटी रुपये) कर्ज घेण्यास तसेच राज्य शासनाच्या निधीच्या प्रस्तावास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे.

या निर्णयामुळे ग्रामीण भागातील रस्ते जाळे अधिक सक्षम होण्यास मदत होणार असून, दुर्गम आणि ग्रामीण भागातील गावांना दर्जेदार रस्ते संपर्क उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांना मोठे बळ मिळणार आहे. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून राज्यातील हजारो किलोमीटर रस्त्यांचे बांधकाम, रुंदीकरण आणि मजबुतीकरण करण्यात येणार आहे.

याचबरोबर महाराष्ट्र राज्य रस्ते सुधारणा प्रकल्पालाही मोठा आर्थिक आधार मिळाला आहे. आशियाई पायाभूत गुंतवणूक बँक आणि न्यू डेव्हलपमेंट बँक या दोन्ही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून प्रत्येकी सुमारे ८ हजार ७०० कोटी रुपयांचे अर्थसहाय्य उपलब्ध होणार आहे.

## गोरस भंडारावर मुंढेंची कारवाई पालकमंत्री भोयरांची मध्यस्थी

■ वर्धा

**अन्न** व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार १९३८ पासून कार्यरत असलेल्या आणि महात्मा गांधी यांच्या सूचनेनुसार सुरू झालेल्या प्रसिद्ध गोरस भंडार संस्थेवर कारवाई करण्यात आली. संस्थेचे कामकाज बंद करण्याचे आदेश देण्यात आल्यानंतर या संस्थेशी संलग्न असलेल्या शेकडो दूध उत्पादक शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले. यानंतर पालकमंत्री डॉ. पंकज राजेश भोयर यांनी मध्यस्थी करत शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे.

कारवाईदरम्यान गोरस भंडारचे बाजारात उपलब्ध असलेले दूध, दही, तूप, खवा, गोरस पाक आणि अन्य दुग्धजन्य पदार्थ परत मागविण्यात आले. तसेच संस्थेचे कामकाज तात्पुरते बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले. या निर्णयानंतर शेकडो दूध उत्पादक शेतकऱ्यांपुढे दुधाची विक्री आणि उत्पन्नाचा प्रश्न निर्माण झाला. संतप्त शेतकऱ्यांनी थेट पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली. शेतकऱ्यांच्या अडचणींची गंभीर दखल घेत पालकमंत्री भोयर यांनी थेट तुकाराम मुंढे यांच्याशी चर्चा करून शेतकऱ्यांच्या हिताबाबत विचारणा केली. त्याचबरोबर दूध संकलन आणि विक्रीची पर्यायी व्यवस्था उभारण्यासाठीही पुढाकार घेतला.

## कुलाब्यातील शववाहिनीवरील नार्वेकर कुटुंबाचे फोटो व्हायरल

■ मुंबई

**कुलाबा** विधानसभा मतदारसंघात नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या एका शववाहिनीवरील भाजपा नेत्यांचे फोटो




व्हायरल झाले आहेत. व्हायरल झालेल्या फोटोत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचा मोठा फोटो लावण्यात आला आहे. त्यासोबतच पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण तसेच मुंबई भाजपा अध्यक्ष अमित साटम यांचे फोटो झळकत आहेत. कुलाबा विधानसभा मतदारसंघातील नागरिकांच्या सोयीसाठी राहुल नार्वेकर यांच्या माध्यमातून अंत्ययात्रेसाठी ही शववाहिनी उपलब्ध करून देण्यात आली आहे. अनेक सामाजिक संस्था, मंडळे व लोकप्रतिनिधी आपल्या भागात शववाहिनीची सुविधा उपलब्ध करून देत असतात. या शववाहिनीवर राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक पातळीवरील भाजपा नेत्यांची छायाचित्रे लावण्यात आल्याने समाजमाध्यमांवर टीका होत आहे.

**एमएमआरडीए म्हणजेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई ट्रान्स हार्बर लिंक अर्थात अटल सेतूवरील जाहिरात हक्क १० वर्षांसाठी देण्यासाठी निविदा जारी केली आहे. या करारासाठी एमएमआरडीएने जीएसटी वगळून वार्षिक २.५ कोटी रुपयांची राखीव किंमत निश्चित केली आहे.**

## अटल सेतूवर जाहिरात किंमत २.५ कोटी रुपये

■ मुंबई

**देशातील** सर्वात लांब समुद्री पूल असलेला अटल सेतू मुंबईतील शिवडी आणि नवी मुंबईतील न्हावा-शेवा यांच्याशी जोडतो. या प्रकल्पाद्वारे टोल आणि प्रवासी शुल्काव्यतिरिक्त महसुलाचे नवे स्त्रोत निर्माण करण्याचा एमएमआरडीएचा उद्देश आहे. या जाहिरात हक्कांमध्ये टोल प्लाझावरील सुविधा, होर्डिंग, किऑस्क तसेच मार्गावरील इतर निश्चित जाहिरात जागांचा समावेश आहे. निविदा दस्तऐवजानुसार हा प्रकल्प 'डिझाईन, बिल्डमॅनेज, ऑपरेट अँड ट्रान्सफर' तत्त्वावर राबविला जाणार आहे. जाहिरात



पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आणि बसवण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी देण्यात आला असून, त्यानंतर १० वर्षे जाहिरातींचे प्रदर्शन व संचालन केले जाईल. यशस्वी बोलीदाराला तिमाही आधारावर प्रदर्शन शुल्क भरावे लागेल. करारावर स्वाक्षरी करण्यापूर्वी १० वर्षांच्या कालावधीतील शेवटच्या सहा महिन्यांच्या भाड्याइतकी सुरक्षा ठेव जमा करावी लागणार आहे. कंपनी कायद्यांतर्गत नोंदणीकृत कंपन्या, भागीदारी संस्था आणि लिमिटेड लायबिलिटी पार्टनरशिप्स (एलएलपी) निविदेत सहभागी होऊ शकतात. मात्र संयुक्त उपक्रमांना म्हणजे जॉईंट व्हेंचरला परवानगी नाही. बोलीदारांची मागील तीन आर्थिक वर्षांतील सरासरी वार्षिक उलाढाल किमान २० कोटी रुपये असणे आवश्यक आहे.

## स्वारगेट प्रकरणी ४५६ दिवसांनंतर दत्ता गाडेविरुद्ध आरोप निश्चित

■ पुणे

**राज्यभरात** खळबळ उडवून देणाऱ्या स्वारगेट अत्याचार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे याच्याविरुद्ध ४५६ दिवसांनंतर न्यायालयाने आरोप निश्चित केले आहेत. त्यामुळे या खटल्याच्या सुनावणीला अधिक वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारात २५ फेब्रुवारी २०२५ रोजी एका प्रवासी तरुणीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. या प्रकरणी गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तत्पर कारवाई करत आरोपी दत्तात्रय गाडे याला अटक केली होती. त्यानंतर अवघ्या ५२ दिवसांत तपास पूर्ण करून पोलिसांनी न्यायालयात ८९२ पानांचे आरोपपत्र दाखल केले. या संवेदनशील प्रकरणात सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी बाजू मांडत आहेत. आरोपीविरुद्ध भक्कम पुरावे सादर करताना त्यांनी ८७ साक्षीदारांची यादी आणि गुन्ह्याशी संबंधित विविध पुरावे न्यायालयासमोर ठेवले.

## जेजुरीत भंडाऱ्यासाठी सक्ती केल्यास गुन्हा दाखल होणार

■ पुणे

**जेजुरीतील** खंडोबा गडावर येणाऱ्या भाविकांकडून भंडारा घेण्यासाठी कोणत्याही प्रकारची सक्ती अथवा दबाव टाकल्यास तो खंडणीचा प्रकार मानला जाईल, असा स्पष्ट इशारा जेजुरी पोलिसांनी दिला आहे.

गेल्या काही काळापासून गडावर पार्किंग शुल्क आणि भंडारा घेण्याच्या सक्तीवरून भाविक व स्थानिक विक्रेते यांच्यात वारंवार वाद होत असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासन आणि ग्रामस्थांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत भाविकांना कोणताही त्रास होणार नाही, यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. यावेळी सहायक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांनी विक्रेते आणि स्थानिकांना स्पष्ट सूचना दिल्या. ते म्हणाले की, भाविकांकडून भंडारा घेण्यासाठी दबाव टाकणे, सक्ती करणे किंवा जबरदस्तीने पैसे उकळण्याचा प्रयत्न करणे हा खंडणीचा प्रकार समजला जाईल. अशा तक्रारी आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.